# प्रकरण तिसरे

## गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण

# प्रकरण तिसरे

## गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण

### गडहिंग्लज नगरपालिकेचा इतिहास

लोकशाही प्रधान राष्ट्रात कारभारात लोकांचा सहभाग आणि निर्णयाच्या प्रक्रियेत लोकमताचा मान या दोन महत्वाच्या गोष्टी होत. भारतासारख्या खंडप्राय देशात एके ठिकाणी बसून संपूर्ण देशाचा कारभार करणे अशक्य आहे. शिवाय देशपातळीवरील शासनाला स्थानिक प्रश्नाची नेमकी जाण असणे शक्य नाही किंवा शासनाच्या विविध योजनेमध्ये स्थानिक जनतेचा पाठिंबा मिळविता येईलच असे नाही. हेरॉल्ड लास्कीच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती ही वरील बाबींमुळे गरजेची ठरली. त्याचप्रमाणे महात्मा गांधीजींच्या सर्वोदय संकल्पनेतील शासन व्यवस्था ही तळापासून वरपर्यंत गेली पाहिजे. ब्रिटिश काळात चालू केलेल्या नगरपालिकेच्या प्रयोगाला भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात विशेष महत्व दिले जाऊ लागले.

ब्रिटिश आमदानीत शासनातील लोकांचा सहभाग वाढावा म्हणून मोठ्या शहरातून नगरपालिकांची स्थापना करण्यात येऊ लागली. कालांतराने ज्या गावांची लोकसंख्या २००० असेल तिथेही टाऊन नगरपालिकेची स्थापना होऊ लागली.

राजर्षी शाहू महाराजानी आपल्या पुरोगामी दृष्टीने ज्या संस्थानाचे नाव सर्वदूर पसरविले त्या कोल्हापूर संस्थानानेही आपल्या राज्यातील अशा गावांशहरात नगरपालिका स्थापन करून लोकशाही प्रक्रिया सुरू केली.

गडहिंग्लज नगरपालिका ही अत्यंत जुनी नगरपालिका आहे. गेली १०८ वर्षे ती कार्यरत आहे. सन १८८७ मध्ये गडहिंग्लजची लोकसंख्या २००० असल्यामुळे आणि लोकइच्छा लक्षात घेऊन गडहिंग्लज येथे नगरपालिका स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आणि १ ऑगस्ट, १८८७ रोजी गडहिंग्लज नगरपालिकेची स्थापना करण्यात आली.

गडहिंग्लज नगरपालिकेच्या स्थापनेपासून ते सन १९२७ अखेर पर्यंत सर्व नगरसेवक (कमिशनर) सरकार नियुक्त होते. त्यातही काही शासकीय अधिकारी व काही स्थानिक प्रतिष्ठित नागरिक यांची नियुक्ती होत असे. नगरपालिकेच्या स्थापनेपासून १५ सभासदांची बॉडी होती. सभासदांना कमिशनर म्हणून संबोधण्यात येत असे. सन १९२७ पर्यंत निवडणूकीद्वारे सभासद निवडले जात नव्हते. दर तीन वर्षांनी सभासदांच्या नावाची यादी सरकारकडून येत असे व ती जनरल सभेत जाहीर करण्यात येत असे. सन १९२७ पासून प्रत्येक वार्डातून दोन याप्रमाणे शहराचे ४ वार्डातून ८ सभासद निवडण्याचे अधिकार परमपूज्य क्षात्रिय कुलावतंस प्रभु श्रीमंत राजाराम महाराज छत्रपती सरकार करवीर यांनी प्रजेच्या अंगी स्थानिक स्वराज्याची सार्वजनिक कामे करण्याची पात्रता जास्त प्रमाणात यावी व स्थानिक स्वराज्य हक्काचा उपभोग घेता यावा म्हणून नगरपालिकेचे अधिकार दिले. याप्रमाणे सन १९२७ पासून ८ सभासद निवडून व ८ सभासद सरकारतर्फे नेमण्यात येऊ लागले.

सन १९२७ पासून नगरपालिकेस आपला अध्यक्ष नेमण्याचा अधिकार प्राप्त झाला. तथापि, परंपरेप्रमाणे सन १९४३ पर्यंत बहुधा सरकारी हायस्कूलचे मुख्याध्यापक यांनाच अध्यक्ष म्हणून बॉडीकडून नेमण्यात येत असे. सन १९२७ ला अध्यक्षांच्या नियुक्तीचे अधिकार बॉडीला प्राप्त झाल्यानंतर पहिले अध्यक्ष श्री. कासमअली हकीम, मामलेदार पेठा गडहिंग्लज यांची निवड

करण्यात आली. तर पहिले स्थानिक व बिगर सरकारी अध्यक्ष म्हणून डॉ. ए.बी. गुणे यांची सन १९४३ मध्ये व श्री. एस्.एन्. पुजारी यांची सन १९४६ मध्ये निवड करण्यात आली.

नगरपालिकेची नवीन घटना शासनाकडून मंजूर होऊन दि.२९.७.१९५२ रोजी नगरपालिकेची प्रत्येक वॉर्डातून ४ उमेदवार याप्रमाणे शहरातील ४ प्रभागातून पहिली निवडणूक होऊन संपूर्ण लोकनियुक्त अशी १६ सभासदांची बॉडी अस्तित्वात आली व पहिली संपूर्ण लोकनियुक्त बॉडी दि. ११.९.१९५२ पासून अधिकारावर आली व संपूर्ण लोकनियुक्त बॉडीचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान श्री. शंकराप्पा गुरुभादाप्पा हिडदुगी यांना मिळाला.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम ९ व १० प्रमाणे नगरपालिका वॉर्डांची सन १९६१ सालचे लोकसंख्येवर आधारित फेररचना होऊन ४ वॉर्डाऐवजी नगरपालिकेची १५ वॉर्डामध्ये विभागणी करण्यात आली. एक सदस्य मतदार संघाप्रमाणे रचना करण्यात आली. त्यापैकी २ जागा स्त्री राखीव व १ स्वीकृत सदस्य याप्रमाणे एकूण सभासद संख्या १६ झाली. तसेच राज्यशासनाकडून नगरपालिकेच्या क्षेत्राच्या लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरण करण्यात येऊन गडहिंग्लज नगरपालिकेस "क" वर्ग मिळाला. या फेररचनेनुसार निवडणूक होऊन बॉडी अधिकारावर आली व नगराध्यक्ष म्हणून डॉ.एस्.एस्. धाळी यांची निवड झाली.

लोकसंख्येच्या आधारे गडहिंग्लज नगरपालिका सध्या "क" वर्गात आहे व निवडून यावयाच्या नगरपित्यांची संख्या किमान १५ ठरविली आहे.

तथापि सन १९७४ मध्ये नगरपालिका अधिनियमात मूलभूत स्वरूपाचे बदल करण्यात येऊन गडहिंग्लज शहराची १५ ऐवजी २० प्रभागात (वॉर्डात) विभागणी झाली. या २० प्रभागात २ स्त्रियांसाठी व १ अनुसूचित जाती/जमातीसाठी राखीव ठेवण्यात आल्या व २ सभासद स्वीकृत या-प्रमाणे एकूण सभासद संख्या २२ झाली व थेट पध्दतीने जनतेकडून निवडून येणा-या अध्यक्षाची १ जागा म्हणून एकूण नगरसेवक २३ इतके झाले. सन १९८१ चे जनगणनेनंतर सन १९८५ च्या सार्वत्रिक निवडणुकीत गडहिंग्लज शहराची २१ प्रभागात विभागणी करण्यात आलेली आहे. या-मध्ये स्त्रियांसाठी २ व अनुसूचित जाती/जमातीसाठी २ या प्रमाणे अध्यक्षां-सह एकूण सदस्य संख्या २३ आहे. स्वीकृत नगरसेवकांची संख्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या संख्येच्या १० टक्के पेक्षा जास्त असता कामा नये असे प्रमाण ठेवलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या दि. २८.१२.१९७२ च्या ठरावाद्वारे नगराध्यक्षांची निवड सर्व मतदारांनी प्रत्यक्ष पध्दतीने करावी अशी शिफारस करण्यात आली व उपाध्यक्षाची नेमणूक आपल्या पसंतीनुरूप व आपल्या मर्जीतील सभासदांमधून स्वत: नगराध्यक्षांनी करावी अशी शिफारस केली.

स्टेट लेव्हल कमिटीच्या शिफारशीस अनुसरून सन १९७४ मधील सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली व या थेट निवडणुकीत डॉ. एस्. एस्. घाळी हेच पहिले जनता अध्यक्ष म्हणून निवडून आले.

या पध्दतीमुळे संबंध महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली, अनेक समस्या निर्माण झाल्या. अनिर्बंध सत्तेमुळे अनेक नगरपालिका बरखास्त झाल्या.

सोईपेक्षा गैरसोयीच फार वाटल्या. या पध्दतीचा फेर विचार शासनाला करावा लागला. परिणामी पूर्ववत पध्दतच पुन्हा ठेवली. अधिनियमाच्या कलमात पुन्हा एकदा सुधारणा केली. व सन १९८५ साली झालेल्या नगरपालिका निवडणुकीत पूर्वीप्रमाणेच निवडून आलेल्या सभासदांमधून नगराध्यक्ष निवडण्याचे अधिकार मिळाले व या निवडीत नगराध्यक्ष होण्याचा मान श्री. भिकाजीराव ईश्वरा मोहिते यांना मिळाला. [१]

गडहिंग्लज नगरीचा एक वैशिष्टयपूर्ण चेहरा आहे. कोल्हापूर जिल्हयातील एक प्रमुख शहर असून, हे शहर हिरण्यकेशी नदीच्या काठी वसलेले आहे. गडहिंग्लज शहर हे कोल्हापूर जिल्हयातील एक आघाडीची प्रमुख बाजारपेठ आहे. एक सुंदर शहर म्हणूनही गडहिंग्लजचा परिचय आहे. येथे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक चळवळी सतत्त होत असतात. एक जागृत शहर म्हणूनही गडहिंग्लजचा परिचय आहे. गडहिंग्लज नगरपालिकेची सध्याची हद्द ही ३३८ हेक्टर आहे. गेल्या १०८ वर्षांच्या वाटचालीत आपल्या शहर सुधारणा करण्यास हातभार लावण्याचे व विकास कामे करण्याचा प्रयत्न अनेक नगराध्यक्षांनी व प्रशासकांनी केला आहे. पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष होण्याचा मान डॉ. ए.बी. गुणे यांना मिळाला. डॉ. एस्.एस्. पाळी यांनी २२ वर्षे नगराध्यक्षपद भूषविले. शताब्दी वर्षाचे नगराध्यक्ष होण्याचा मान समाजवादी नेते प्रा. विठ्ठल बन्ने यांना मिळाला. [२] गडहिंग्लज नगरपालिकेच्या स्थापनेपासूनचे ते आजपर्यंत अध्यक्ष व प्रशासकखालीलप्रमाणे -

| अ.नं. | अध्यक्षाचे/प्रशासकाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| | **हुद्दयाचे नात्याने असणारे सरकार नियुक्त अध्यक्ष** | |
| १. | मे. रावसो डिस्ट्रिक ऑफीसर, इलाखा करवीर | १.८.१८८७ ते १९२५-२७ |
| | **सरकार नियुक्त ८ व लोकनियुक्त ८ मधील लोकनियुक्त अध्यक्ष** | |
| २. | श्री. कासम अली हकीम (मामलेदार) | २६.४.१९२७ ते ९.४.१९२८ |
| ३. | " बी.एस्. पाटील (मामलेदार) | १४.५.२८ ते २१.५.३२ |
| ४. | " एन्.बी. लक्का (मामलेदार) | २२.५.३२ ते २१.१२.३३ |
| ५. | " बळवंत बाबाजी रेंदाळे (नॉमिनेटेड) | १८.५.३३ ते २१.१२.३३ |
| ६. | " डी.एल्.पाटील, मुख्याध्यापक एम्.आर. हायस्कूल. | २२.१२.३३ ते २३.५.३५ |
| ७. | " आर.एल्. तावडे, मामलेदार | २४.२.३५ ते २२.५.३९ |
| ८. | " शंकरराव बळवंतराव चव्हाण, मामलेदार | ११.९.३९ ते १७.२.४३ |
| ९. | " डॉ.ए.बी. गुणे (सरकारबाह्य पहिले नगराध्यक्ष) | १८.२.४३ ते २३.६.४६ |
| १०. | " एस्.एन्. कुरे | २४.६.४६ ते ११.९.१९५२ |
| | **संपूर्ण लोकनियुक्त बॉडीतील अध्यक्ष** | |
| ११. | श्री. एस्.जी. हिडदुगी | १२.९.५२ ते २५.१२.५३ |
| १२. | " आर.वाय्. देशपांडे | २६.१२.५३ ते १९.२.५६ |
| १३. | " व्ही.आर. नेने, मामलेदार(प्रशासक) | १९५६ |
| १४. | " पी.पी. पंडीत,मामलेदार (प्रशासक) | १९५७ |
| १५. | श्री.डॉ. एस्.एस्. मोळदी | २६.१२.५७ ते २५.१२.५८ |
| १६. | श्री. एम्.बी. मुजुमदार (वकील) | २.२.५९ ते ९.२.६० |

| अ.नं. | अध्यक्षाचे/प्रशासकाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १७. | श्री.डॉ. एस्.एस्. धाळी | २४.२.६० ते १९.२.६१ |
| | | १९.७.६२ ते १.७.६७ |
| | | २.७.६७ ते ५.२.८१ |
| १८. | " आर.एस्. संकपाळ | १६.३.६१ ते १८.७.६२ |
| १९. | श्री. बी.ए. पाटील, मुख्याधिकारी (प्रशासक) | ६.२.८१ ते ९.८.८१ |
| २०. | " डी.जी. कुलकर्णी,सेंबूडकर, मामलेदार (प्रशासक) | १०.८.८१ ते ३.५.८२ |
| | | ३.६.८२ ते १२.७.८२ |
| | | १६.८.८२ ते २३.८.८२ |
| २१. | " एन्.बी.दळवी, मामलेदार (प्रशासक) | ४.५.८२ ते २.६.८२ |
| | | १३.७.८२ ते १५.८.८२ |
| २२. | " एस्.बी. खारोडे,मामलेदार (प्रशासक) | २५.८.८२ ते ४.८.८४ |
| | | ५.११.८४ ते १५.२.८५ |
| २३. | " ए.बी.मेस्त्री, मामलेदार (प्रशासक) | ५.८.८४ ते ४.११.८४ |
| | | १६.२.८५ ते १४.५.८५ |
| २४. | " भिकाजीराव ईश्वरा मोहिते | १५.५.८५ ते १५.६.८६ |
| २५. | " टी.रम्. सातपुते, मामलेदार (प्रशासक) | २३.६.८६ ते ३०.६.८६ |
| २६. | " जे.आर. पेडणेकर | १.७.८६ ते ५.३.८७ |
| २७. | " एम्.एच्. सावंत (प्रशासक) | १३.३.८७ ते १९.३.८७ |
| २८. | " प्रा. विठ्ठल बन्ने | १९.३.८७ ते १६.५.८८ |
| २९. | " डी.डी.दळवी, मामलेदार (प्रशासक) | १.६.८८ ते १४.६.८८ |
| ३०. | " एस्.बी. खणगावे | १४.६.८८ ते ३.७.८९ |

| अ.नं. | अध्यक्षाचे/प्रशासकाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| ३१. | श्री. यु.अ.पोमण, मामलेदार (प्रशासक) | ४.७.८९ ते १७.७.८९ |
| ३२. | " भिमराव ईराप्पा नेवडे | १८.७.८९ ते ३०.६.९१ |
| ३३. | " पी.एच्. कदम, मामलेदार (प्रशासक) | १.७.९१ ते ९.७.९१ |
| ३४. | " दत्तात्रय संतराम बर्गे | १०.७.९१ ते १६.१२.९१ |
| ३५. | " धोंडीराम संतराम कदम | १७.१२.९१ ते २१.५.९३ |
| ३६. | " कांतीलाल उमाप (प्रांताधिकारी) | २७.५.९३ ते ७.६.९३ |
| ३७. | " राजन जनार्दन पेडणेकर | ८.६.९३ ते ९.१०.९६ |

अशाप्रकारे आजपर्यंतचा गडहिंग्लज नगरपरिषदेचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की, गडहिंग्लज नगरपालिकेची स्थापना सन १८८७ साली झाली. त्यावेळी सर्व सभासद हे सरकारनियुक्तच असत. सन १९२७ पासून सरकार नियुक्त सभासदांखेरीज निम्मे सभासद निवडणुकीद्वारे लोक नियुक्त होऊ लागले. सन १९२७ ते १९४३ पर्यंत मामलेदार किंवा तत्सम सरकारी अधिकारी हेच प्रसिडेंट म्हणून निवडले जात असत. हुद्देदार नसलेले सरकार बाहय पहिले नगराध्यक्षपद गडहिंग्लजच्या नागरिकाकडे सन १९४३ साली प्रथम आले. सन १९५२ मध्ये प्रथम सर्व सभासद निवडणुकीने निवडून आले.

सन १९५६-५७ या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सर्व सदस्यांनी राजीनामे दिल्याने व पुढे सन १९८१ ते १९८५ या काळात नगरपालिकेची मुदत संपल्यामुळे नगरपालिका बरखास्त करण्यात आली व या मुदतीत शासनामार्फत प्रशासकांनी कारभार चालविला. [3] डॉ. एस्.एस्. घाळी यांनी २२ वर्षे

इतक्या दिर्घ कालावधीपर्यंत नगराध्यक्षपद भूषविले आहे. गडहिंग्लज नगरपालिकेच्या इतिहासात एवढया दिर्घकालावधीपर्यंत नगराध्यक्षपद सांभाळणारे ते पहिले नगराध्यक्ष आहेत. सन १९८५ ते १९९१ या काळात प्रत्येक वर्षी अध्यक्ष बदललेला दिसतो.

## १९८५ पर्यंत गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण

सन १९४३ मध्ये डॉ. ए.बी. गुणे हे सरकार नियुक्त सदस्य म्हणून नगरपरिषदेवर आले आणि सरकारबाह्य नगराध्यक्ष म्हणून ते गडहिंग्लज नगरपालिकेचे पहिले नगराध्यक्ष बनले. त्याकाळी नगरपालिकेचे उत्पन्न तुटपुंजे असल्यामुळे प्रत्यक्ष फार काही करता आले नाही, तरीही ब-याच योजना आखण्यात आल्या. गडहिंग्लजच्या पाणी पुरवठयाचा आराखडा डॉ ए.बी. गुणे यांच्या कारकिर्दीत आखण्यात आला. श्री. एस्.एन्. फुारे यांनी सन १९३७ पासून नगरपालिका सदस्य म्हणून काम करण्यास सुरवात केली होती. सन १९४६ ते १९५२ या काळात नगराध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. नगरपालिकेचे उत्पन्न कमी असतानाही प्रामाणिकपणे काम करुन नगरपालिकेच्या कामकाजात शिस्त निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. श्री. शंकरराव हिडदुगी हे १९३७ पासून नगरपरिषदेचे सदस्य होते. सन १९५२ मध्ये ते संपूर्ण लोकनियुक्त बॉडीचे पहिले नगराध्यक्ष बनले. काटकसरीने व्यवहार पाहून नगरपरिषदेच्या वाढीसाठी त्यांनी प्रयत्न केले. सन १९५३ ते १९५६ या काळात ॲड. आर.वाय्. देशपांडे यांनी नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. अनेक वर्षे कागदोपत्री अडकून पडलेला जकातीचा प्रश्न श्री. देशपांडे यांनी सोडवून नगरपरिषदेच्या विकासाची दारे खुली केली. सन १९५५ मध्ये जकातकर सुरु झाल्यानंतरच नगरपरिषदेच्या विकासास खरी चालना मिळाली.

राष्ट्रीय आणि न्याय्य हक्काच्या संघर्षात गडहिंग्लज शहर नेहमीच जागरूक राहिले आहे. भाषावार प्रांतरचनेमध्ये महाराष्ट्रावर जो अन्याय केला गेला त्याचा निषेध म्हणून गडहिंग्लजमध्ये आंदोलने झालीच पण त्याबरोबरच गडहिंग्लज नगरपरिषदेने या घटनेचा निषेध म्हणून १९५६ साली निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सभासदपदाचे राजीनामे देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन १९५७-५८ मध्ये डॉ. एस.एस. मोळदी यानी नगराध्यक्षपद भूषवून पाणीपुरवठा मार्गी लावला. गडहिंग्लजच्या योजनाबध्द विकासाची मुहुर्तमेढ रोवली. सन १९५९-६० या काळात डॉ.एम्.बी. मुजुमदार यांनी नगराध्यक्ष म्हणून काम पाहिले. या काळात वीज आणण्याचे यशस्वी प्रयत्न झाले. गडहिंग्लज शहर आणि तालुक्यातील सार्वजनिक कामाचे हिशोब मांडताना डॉ. एस.एस. घाळी यांना वजा करून काहीच मांडता येणार नाही. सन १९६०-६१ व १९६२ ते १९८१ या काळात त्यांनी नगराध्यक्षपद भूषविले. १९७४ मध्ये थेट निवडणुकीत नगराध्यक्ष म्हणून डॉ. घाळी विजयी झाले. १९७४ च्या निवडणुकीत बहुसंख्य सभासद जनता आघाडीचे निवडून आले. पण नगराध्यक्षपदाची माळ जनतेने डॉ. एस.एस. घाळी यांच्या गळ्यातच घातली. सन १९७४ पर्यंत कॉंग्रेस पक्षाचीच सत्ता नगरपरिषदेत असलेली दिसते. १९७४ च्या निवडणुकीत जनता आघाडीचे जास्त सभासद निवडून आले. पण याचवेळी नगराध्यक्ष पद जनतेकडून थेट निवडणूक पध्दतीने निवडण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारने स्वीकारले व यामध्ये डॉ. एस.एस. घाळी यांनी नगराध्यक्ष पद जिंकले. त्यामुळे स्पष्ट बहुमत नसतानाही कॉंग्रेसकडेच नगरपरिषदेची सत्ता असलेली दिसते. डॉ. आर. एस. संकपाळ यांनी सन १९६१-६२ मध्ये नगराध्यक्षपद सांभाळले. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात डॉ. आर.एस. संकपाळ यांनीही कॉंग्रेस पक्षाच्या

जडणघडणीमध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सतत तीन वेळा निवडून आलेले व एकदा अध्यक्ष व एकदा उपाध्यक्ष पद भूषविलेले होते. गडहिंग्लज तालुका खरेदी विक्री संघाचे अनेक वर्षे सदस्य अध्यक्ष होते. गडहिंग्लज तालुक्यातील प्रमुख राजकीय कार्यकर्ते होते. [४]

सन १९८१ मध्ये नगरपरिषदेची मुदत संपल्यामुळे नगरपालिका बरखास्त करण्यात आली आणि १९८१ ते १९८५ या काळात शासनामार्फत प्रशासकांनी पालिका कारभार चालविला.

आजपर्यंत नगरपरिषदेचा इतिहास असा आहे की, गडहिंग्लजमधल्या नगरपालिकेच्या निवडणुका काँग्रेस पक्षाने आपल्या एकदाच लढविल्या आहेत. आणि त्यानंतर ज्या निवडणुका झाल्या त्या पक्षाविरहीत आहेत. नागरी संघटनेमार्फत नगरपालिका निवडणुका लढविल्या आहेत. काँग्रेसने कधीच नगर-परिषदेच्या निवडणूका लढविल्या नसल्या तरी या नगरपरिषदेचा व नागरी संघटनेचा १९८१ पर्यंतच्या कालावधीमध्ये काँग्रेसला पाठिंबा कायम असे. विधान-सभांच्या निवडणुकीच्या वेळी जो काँग्रेसचा उमेदवार असेल त्याला हे पाठिंबा देत असत व काँग्रेसचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करीत असत. गडहिंग्लज नगरपरिषदेचे अध्यक्षपद हे पक्षीय स्वरूपाचे नव्हते, परंतु काँग्रेस-पक्षाला नगरपरिषदेने पाठिंबा दिलेला आहे.

## गडहिंग्लज नगरपालिकेत डॉ. एस्.एस्. घाळी यांचे योगदान

डॉ. एस्.एस्. घाळी हे २४ फेब्रुवारी, १९६० ते १९ फेब्रुवारी, १९६१ या काळात ते प्रथमत: गडहिंग्लज नगरपरिषदेचे अध्यक्ष झाले. त्यानंतरचा

अल्पकाळ वजा करता दि. १९ जुलै, १९६२ ते ५ फेब्रुवारी, १९८१ अखेर नगराध्यक्षपद भूषविणारी ती पहिलीच व्यक्ती म्हणावी लागेल. विशेषत: १९७४ ते १९८१ या काळात जेंव्हा महाराष्ट्रात प्रथमत:च नगराध्यक्षपद प्रत्यक्ष मतदाराकडून निवडले जाण्याचा प्रयोग करण्यात आला तेंव्हा विरोधी गटाचे उमेदवार संख्येने अधिक निवडून येऊनही नगराध्यक्षपद मात्र डॉ. घाळी यांनाच मिळाले. याचाच अर्थ असा की, लोकांनी जरी आपल्या वॉर्डातून विरोधी उमेदवाराला मत दिले असले तरी नगराध्यक्षपदासाठी डॉ. घाळींनाच मत दिले होते. डॉ. एस्.एस्. घाळी यांनी २२ वर्षे इतक्या प्रदीर्घ काळात नगराध्यक्ष भूषविले. त्यामुळे गडहिंग्लज नगरपालिकेच्या जडणघडणीत डॉ. घाळी यांचे योगदान अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे आहे. त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेणे उचित ठरेल.

सन १९५० ते १९५९ या काळात जकात कमिटीची स्थापना होऊन नगरपालिकेचे उत्पन्न खूपच सुधारले. यासाठी डॉ. घाळी यांचे प्रयत्न मोलाचे व परिणामकारक ठरले. लोककल्याणाच्या कार्यापैकी महत्वाची योजना म्हणजे पाणीपुरवठयाची योजना होय. सन १९५२ साली सरकारकडून मंजूर झालेली योजना डॉ. घाळी आणि त्यांच्या सहका-याच्या प्रयत्नातून १९६६ साली यशस्वी झाली. १२ लाख ८८ हजार रूपयांची योजना मंजूर होऊन कार्यान्वित झाली व पाण्यासाठी "दाहीदिशा" ही स्थिती बदलली. डॉ. घाळी यांच्या प्रयत्नामुळेच १४ ऑगस्ट, १९६१ रोजी वीज योजना प्रत्यक्षात अंमलात आली. गडहिंग्लज नगरीच्या रस्त्यांच्या डांबरीकरणाचा प्रश्न हाती घेऊन तो तडीस नेला. गडहिंग्लज नगरपालिका जुनी पण नगरपरिषदेची इमारत सुधारीत नव्हती. म्हणून आज जी सुसज्ज अशी गडहिंग्लज नगरपरिषदेची इमारत डौलाने उभी आहे ती डॉ. घाळी यांच्या प्रयत्नामुळेच. गडहिंग्लज नगरीच्या सौंदर्यात भर घालणारी एक प्रमुख वास्तू आहे. डॉ. घाळी यांच्याच कारकीर्दीत नगरपरिषदेची सार्वजनिक वाचनालय इमारतही बांधण्यात आली.

जनतेच्या सोयीबरोबरच नगरीच्या सौंदर्यात भर घालणारे पुतळे, बागा इ. बाबतही डॉ. घाळी यांच्या काळात प्रयत्न झाले. भुयारी गटारांची योजना ही सुध्दा याच काळातील एक पुरोगामी योजना आहे. डॉ. घाळी यांनी जागा उपलब्ध करुन दिल्यामुळेच एस्.टी. स्टँड, एस्.टी. डेपो, इलेक्ट्रिसिटी बोर्डाची इमारत इत्यादी योजना यशस्वी झाल्या. शाहू मार्केट यार्ड प्रवेशद्वार व शाहू मार्केट यार्ड समोरील श्री शाहू महाराजांचा पुतळा याबाबतही डॉ. घाळी यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट कौन्सिलचे सदस्य म्हणून १९६२ साली डॉ. घाळी यांची निवड झाली. त्यावेळी गडहिंग्लज, चंदगड व आजरा या दक्षिण कोल्हापूरातील तिन्ही तालुक्यामध्ये एकही महाविद्यालय नव्हते. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व्ही.टी. पाटील यांच्या सहकार्याने शिवराज कॉलेजची स्थापना करण्यात महत्वाची भूमिका डॉ. घाळी यांनी बजावली. डॉ. घाळी यांनी १९६३ साली विद्याप्रसारक मंडळाची स्थापना करुन शिक्षण प्रसारासाठी हातभार लावला.[5] विद्या-प्रसारक शिक्षण मंडळाच्या विविध शाखा गडहिंग्लज शहरात व तालुक्यात कार्यरत आहेत. गडहिंग्लज शहरातील सुमारे ऐंशी टक्के छोटे-मोठे उद्योग डॉ. घाळी यांच्या हस्ते सुरु झालेले आहेत. वैद्यकिय व्यवसायाने ग्रामीण भागात घरोघरी त्यांचे नाव पोहचले होते. गडहिंग्लजच्या प्रगतीमध्ये डॉ. घाळी यांचा सिंहाचा वाटा आहे.

## डॉ. एस्.एस्. घाळी यांच्या यशामध्ये नगरपालिकेचे राजकारण

गडहिंग्लज नगरपालिकेचे डॉ. घाळी यांनी तब्बल २२ वर्षे नगराध्यक्ष-पद भूषविले. सामाजिक सेवेची आवड म्हणून त्यांनी नगरपालिका राज-

कारणात प्रवेश केला. राजकीय क्षेत्रात तसेच सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सिंहाचा वाटा दिसून येतो. त्यांनी तालुक्यातील अनेक खेड्यांचा विकास केलेला दिसून येतो. ज्या ठिकाणी संस्था निघाल्या, त्या संस्थाना ताबडतोब मान्यता देण्यासाठी त्यांनी सदैव प्रयत्न केले. नगराध्यक्ष म्हणून कार्य करीत असताना तालुक्यातील सर्वसामान्य जनतेशी त्यांचा जवळचा संबंध प्रस्थापित झाला. सहकारातून समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी त्यांनी प्रयत्न केले होते. त्यांच्या या लोकप्रियतेमुळेच ते राजकारणात यशस्वी ठरले. त्यांनी समाजविकासासाठी राजकारण हे ध्येय स्वीकारले होते. राजकीय क्षेत्रातील पक्षाशी एकनिष्ठ राहून विरोधकांनाही आपलेसे करण्याची किमया त्यांच्याजवळ होती.

सन १९७४ च्या नगरपालिका निवडणूकीत विरोधकाचे बहुमत असतानाही नगराध्यक्ष जनतेकडून निवडण्याच्या पध्दतीमुळे डॉ. घाळी यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली. गडहिंग्लजचे नगराध्यक्ष म्हणून कार्य करीत असताना विविध निवडणुकामध्ये त्यांनी कॉंग्रेस उमेदवाराला साथ दिली होती. अनेक विधानसभा निवडणूकीत तिकिट वाटपावेळी डॉ. घाळी यांच्या नावाची चर्चा होत असे. परंतु त्यांना १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत गडहिंग्लज मतदार संघातून कॉंग्रेस(आय) पक्षाची उमेदवारी मिळाली आणि या निवडणुकीत ते विजयी झाले. पश्चिम महाराष्ट्रात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यातून कॉंग्रेस (आय) तिकिटावर विजयी झालेले ते एकमेव उमेदवार होते. इंदिरा गांधींना हे जेव्हा कळले तेव्हा त्यांनी एकाला विचारले, "कहाँ है ये गडहिंग्लज, कौन है वो घाली". १९८० साली मुदतपूर्व निवडणूक झाली. या निवडणुकीत डॉ. घाळींनी कॉंग्रेस (आय) पक्षाच्या तिकिटावर

निवडणूक लढविली. दुस-या वेळीही ते विजयी झाले. डॉ. चाळी यांच्या विधानसभा निवडणुकीच्या यशामध्ये गडहिंग्लज नगरपालिकेचा मोठा वाटा आहे. गडहिंग्लज नगरीने त्यांना भरघोस पाठिंबा दिला होता. नगराध्यक्षपद सांभाळीत असताना सामान्य जनतेशी अतूट नाते निर्माण झाले होते. आठ वर्षांच्या आमदारकीच्या काळात त्यांनी तालुक्याचे उत्तम प्रतिनिधित्व केले. १९८५ पूर्वीच्या गडहिंग्लज तालुक्यातील राजकारणाचा विचार केला तर गडहिंग्लज तालुका हा काँग्रेस (आय) पक्षाचा बालेकिल्ला समजला जात होता. तालुक्यावर काँग्रेस पक्षाची चांगली पकड होती. पंचायत समिती, जिल्हा परिषद, तालुका संघ, बाजार समिती, जिल्हा बँक सर्वच ठिकाणी काँग्रेस (आय) पक्ष सत्तेवर होता. आमदारकीसुध्दा याच पक्षाकडे होती. डॉ. शिवलिंग चाळी यांनी दहा वर्षांहून अधिक काळ तालुक्याचे नेतृत्व यशस्वीपणे केले. डॉ. चाळी यांनी तालुका काँग्रेसचे एकमुखी समर्थ नेतृत्व केले. गडहिंग्लज तालुक्याच्या काँग्रेस (आय) पक्षातील विविध गटांना यशस्वीरित्या सांभाळून नेणारे डॉ. शिवलिंग चाळी यांचे नेतृत्व होते.

## १९८५ ते १९९१ पर्यंतचे गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण

काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून गडहिंग्लज तालुक्याची ओळख होती. हा किल्ला १९८५ नंतर ढासळू लागला. वेगाने पडझड सुरु झाली. सन १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाचे ॲड. श्रीपतराव शिंदे यांनी काँग्रेस (आय) पक्षाचे डॉ. एस.एस. चाळी यांचा पराभव केला आणि काँग्रेस (आय) च्या अभेद्य किल्ल्याला खिंडार पडले. त्यावेळेपासून काँग्रेस पक्षाला तालुका राजकारणात उतरती कळा लागली. "पुलोद" चे राजकारणही येथील काँग्रेस (आय) पक्षाला हानिकारक ठरले.

सन १९७४ च्या नगरपालिका निवडणुकीत जनता आघाडीला बहुमत मिळाले. त्यावेळेपासूनच गडहिंग्लज नगरपालिकेत जनता आघाडीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. परंतु १९७४ साली महाराष्ट्र शासनाने थेट जनतेकडून नगराध्यक्ष निवडीचे धोरण अंमलात आणले व या थेट निवडणुकीत डॉ. एस्.एस्. घाळी हेच पहिले जनता अध्यक्ष म्हणून निवडून आले. नगरपालिकेत बहुमत नसतानाही डॉ. एस्.एस् . घाळी हे महाराष्ट्र शासनाच्या नवीन धोरणानुसार नगराध्यक्ष झाले. सन १९८१ साली नगरपालिकेची मुदत संपली. शासनाने ५.२.१९८१ रोजी नगरपालिका बरखास्त केली व प्रशासकीय कारकिर्द चालू झाली.

## १९८५ ची गडहिंग्लज नगरपालिकेची निवडणूक

सन १९८५ मध्ये प्रशासकीय कारकिर्द संपून शासनाने नगरपालिकांच्या निवडणूका घेतल्या. राजकारणामध्ये नगरपालिका, पंचायत समिती, बँक, खरेदी विक्री संघ, सहकारी साखर कारखाना इत्यादी संस्था विकास कार्यास सहाय्यक ठरतात. मार्च, १९८५ मध्ये घेण्यात आलेल्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाचे श्रीपतराव शिंदे यांनी विजय मिळविला. गडहिंग्लज तालुक्याच्या यानंतरच्या राजकारणात श्रीपतराव शिंदे यांचा नव्याने उदय झाला. गडहिंग्लज शहराच्या विकासासाठी आणि तालुका राजकारणामध्ये आपला पाया भक्कम करण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांनी नगरपालिकेच्या निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाचा विजय झालेला असल्यामुळे नगरपालिकेच्या निवडणूका जिंकण्यासाठी अनुकूल असे वातावरणही निर्माण झाले होते.

तब्बल ५ वर्षांच्या प्रशासकीय कारकिर्दीनंतर गडहिंग्लज नगर-परिषदेची निवडणूक होत होती. दि. २५ एप्रिल, १९८५ ला होणाऱ्या या नगरपालिका निवडणुकीत अनेक रथी-महारथी उतरले होते. निवडणूक रिंगणात प्रामुख्याने आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता पक्षाची जनता आघाडी आणि डॉ. घाळी यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस (आय)पक्षाची नगरविकास आघाडी यांच्यातच खरी लढत होती. असे असले तरी कॉंग्रेस (आय) पक्षाच्या नगरविकास आघाडीला काही विभागात उमेदवारही मिळालेले नाहीत. सर्व जागावर जनता आघाडीने उमेदवार उभे केले होते. त्यापाठोपाठ नगरविकास आघाडीचे उमेदवार उभे होते. नगर-पालिकेच्या २० जागासाठी ५७ उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. यापूर्वी कधी नव्हती एवढी चुरस या निवडणुकीत निर्माण झाली होती. या निवडणुकीत १० वॉर्डामध्ये सरळ लढती होत्या. जनता आघाडीचे श्री. दशरथ कांबळे हे वॉर्ड नं. ४ मधून बिनविरोध निवडून आले. बाकी ९ विभागात तिरंगी चौरंगी लढतीचे चित्र होते. या विभागात अपक्षांची उमेदवारी दोन्ही आघाड्यांना जड जाणारी ठरली.

जुन्यापैकी ९ नगरसेवक पुन्हा निवडणूक रिंगणात असले तरी २२ वर्षे नगराध्यक्ष असलेले डॉ. एस.एस. घाळी आमदार श्रीपतराव शिंदे, रुद्राप्पा हत्ती, वीरबसाप्पा घुगरे ही अभ्यासू मंडळीनी निवडणूक लढविली नाही. १९८७ साली नगरपरिषदेचे शताब्दी वर्ष असल्यामुळे शतक महोत्सवी वर्षात नगरसेवक होण्याचा बहुमान आपल्या पदरी पडावा म्हणून प्रत्येकजण प्रतिष्ठा पणाला लावीत होता. जनता आघाडीच्या विजयासाठी आमदार श्रीपतराव शिंदे व नगरविकास आघाडीच्या विजयासाठी माजी आमदार डॉ. एस.एस. घाळी यांनी विशेष प्रयत्न केले होते. जनता आघाडीचे

प्रा. विठ्ठल बन्ने यांनी जनता आघाडीचा जाहीरनामा घोषित केला. या जाहिरनाम्यानुसार हडकोच्या साहाय्याने मध्यमवर्गीयांना घरे, मागासवर्गीयांना घर, स्वच्छ भरपूर पाणी, सुपर मार्केट, जनता भांडार, छोट्या व्यापारांना गाळे, नवीन गटर योजना, मिनी स्टेडीयम, आखाडा, व्यायामशाळा खुले रंगमंच, महिलासाठी निराधार उद्योग केंद्र, कॉटेज हॉस्पिटल इत्यादी योजना ५ वर्षात अंमलात आणू असे आश्वासन दिले. माजी आमदार डॉ. एस्.एस्. घाळी यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवाचे उट्टे भरून काढण्यासाठी व विरोधकांनी लावलेला जातीय गाल-बोटाचा कलंक धुवून काढण्यासाठी उमेदवार निवडीचे काम श्री. डी.एस्.कदम यांचे गटाकडे सोपविले. विशेष म्हणजे तालुक्यातील कॉंग्रेस (आय) पक्षाचे भवितव्य ठरविणारी ही निवडणूक होती.

सन १९८५ च्या गडहिंग्लज नगरपरिषदेचा निवडणूक निकाल खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदार | - | १०,२२४ |
| झालेले मतदान | - | ८,५१६ |
| एकूण टक्केवारी | - | ७३.५ |
| एकूण वॉर्डस | - | २१ |
| स्वीकृत सभासद | - | २ |

निवडणूक दि. २५.४.१९८५ रोजी होऊन खालील सभासद निवडून आले.

| अ.नं. | निर्वाचित नगरसेवक | जनताआघाडी/नगरविकास आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. धोंडीराम संतराम कदम | काँग्रेस(आय) प्रणित, नगरविकास आघाडी |
| २. | सौ. पूजा अमरनाथ घुारी | -"- |
| ३. | श्री. विवेक महालिंगाप्पा पाटणे | -"- |
| ४. | " इब्राहिम अब्दूल बेडक्याळे | -"- |
| ५. | " महमद हनिफ काशीम मुल्ला | -"- |
| ६. | " शिवाजी बसाप्पा खणागावे | जनतापक्ष प्रणित जनता आघाडी |
| ७. | " दशरथ विठ्ठल कांबळे | -"- |
| ८. | " जनार्दन रघुनाथ पेडणेकर | -"- |
| ९. | " बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री | -"- |
| १०. | " हारुण ईस्माईल सय्यद | -"- |
| ११. | " बाळासाहेब बंडू मोरे | -"- |
| १२. | " दत्तात्रय संतराम बरगे | -"- |
| १३. | " भिमराव ईराप्पा नेवडे | -"- |
| १४. | " अरुण बाबुराव तेलवेकर | -"- |
| १५. | " विठ्ठल सिद्दाप्पा बन्ने | -"- |
| १६. | " भिकाजीराव ईश्वरा मोहिते | -"- |
| १७. | " सुरेश केशवराव देशपांडे | -"- |
| १८. | सौ. अरुणा रमेश देशपांडे | -"- |
| १९. | श्री. सखाराम राजाराम देवार्डे | -"- |
| २०. | " अविनाश गणेश आलूरकर | -"- |
| २१. | डॉ. वसंतराव ईश्वर पेडणेकर | -"- |
| २२. | श्री. बसवराज शोट्याप्पा शिंत्रे (स्वीकृत) | -"- |
| २३. | " शंकरराव आप्पासाहेब मोहिते (स्वीकृत) | -"- |

वरीलप्रमाणे गडहिंग्लज नगरपरिषदेची सन १९८५ मध्ये निवडणूक होऊन त्यात जनता आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले. एकूण २१ नगरसेवकां- पैकी आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या जनता पक्ष पुरस्कृत जनता आघाडीला १६ जागा मिळाल्या, तर कॉंग्रेस (आय) प्रणित नगरविकास आघाडीला ५ जागा मिळाल्या. स्वीकृत २ सभासद अर्थातच जनता आघाडीचे येऊन विद्यमान नगरसेवकांची संख्या १८ झाली. जनता आघाडीने पूर्वीच्या नगरपालिकेत केलेली कामे, या आघाडीमार्फत उभ्या असलेल्या व्यक्ती, जनता आघाडीचा जाहीरनामा आणि आमदार श्रीपतराव शिंदे यांचे शर्थीचे प्रयत्न यामुळे जनता पक्ष पुरस्कृत जनता आघाडीला भरघोस यश मिळाले. विशेष म्हणजे "पुलोद" पुरस्कृत बाबा कुपेकर गटानेही जनता आघाडीला पाठिंबा दिला होता. निवडणूक प्रचार शुभारंभाचा नारळ श्री. बाबासाहेब कुपेकर यांच्या हस्ते फोडण्यात आला होता. जनता पक्ष पुरस्कृत आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता आघाडीला नगरपालिकेची सत्ता काबीज करण्यात यश मिळाल्यामुळे गडहिंग्लज शहरावरही आमदार श्रीपतराव शिंदे यांचेच नेतृत्व प्रस्थापित झाले. कारण गडहिंग्लज तालुका मतदार संघामध्ये गडहिंग्लज शहराचा समावेश आहे. अशाप्रकारे आमदार श्रीपतराव शिंदे यांनी गडहिंग्लज तालुक्यात आपला प्रभाव प्रस्थापित केला. नगरपरिषदेमध्ये आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या जनता आघाडीला बहुमत मिळाल्यामुळे गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात त्यांनी आपले पाय घट्ट रोवले.

## सन १९८५ ते १९९१ या काळातील गडहिंग्लज नगरपालिकेतील नगराध्यक्ष

सन १९८५ च्या नगरपरिषदेच्या निवडणुकीत जनता दलाच्या जनता आघाडीने बहुमत मिळविले. जनता आघाडीचे नेते आमदार श्रीपतराव शिंदे यांनी दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा सुरु ठेवली. भिकाजीराव माहिते,

दादा पेडणेकर, प्रा. विठ्ठल बन्ने, शिवाजीराव खणगावे, भीमराव नेवडे यांना संधी मिळाली. शेवटच्या वर्षात दत्ताजीराव कर्णे यांच्याकडे नगराध्यक्षपद देण्यात आले.

सन १९८५ साली झालेल्या नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्ष प्रत्यक्ष जनतेकडून न निवडता निवडून आलेल्या सभासदामधून नगराध्यक्ष निवडण्याचे धोरण महाराष्ट्र शासनाने पुन्हा सुरू केले. गडहिंग्लज नगरपरिषदेत निवडून आलेल्या नगरसेवकांमधून अध्यक्ष होण्याचा मान श्री. भिकाजीराव मोहिते यांनी पटकाविला. श्री. भिकाजीराव मोहिते यांनी सन १९६७ पासून नगरसेवक म्हणून कार्य करीत असता नगरपरिषदेच्या कामाला वेगळी दिशा देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. सन १९८५ मध्ये नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्यानंतर जनता खुले नाट्यगृह, राममनोहर लोहिया मैदान, रुग्णवाहिका खरेदी, दवाखाना, सुधारित पाणीपुरवठा योजनेचा पाठपुरावा, मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाची पूर्तता, आरोग्य शिबीरे, बालवाड्यांचा प्रारंभ, काळू मास्तरपुतळा, बोअर, पाणी टाक्यांची व्यवस्था इत्यादी प्रचंड काम केले आहे. नगराध्यक्षपदी असतानाच बेळगाव, निपाणी इत्यादी भाग महाराष्ट्रात यावा म्हणून निपाणी येथे जनता पक्ष नेते श्री. निहाल अहमद यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या सत्याग्रहात सहभागी झाले होते. भिकाजीराव मोहिते यांनी दि. १५.५.१९८५ ते १५.६.१९८६ या काळात नगराध्यक्ष पद भूषविले. [८]

भिकाजीराव मोहिते यांच्यानंतर जनार्दन पेडणेकर यांनी दिनांक १.७.१९८६ ते ५.३.१९८७ या काळात नगराध्यक्ष पद सांभाळले. गडहिंग्लजच्या समाजकारणात आणि राजकारणात ४० वर्षाहून अधिक काळ जनार्दन रघुनाथ उर्फ दादा पेडणेकर क्रियाशील कार्यकर्ते होते. गडहिंग्लज

नगरपरिषदेत १९५२ पासून नगरसेवक होते. राष्ट्रसेवादल आणि प्रजा-समाजवादी आणि नंतर समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते म्हणून त्यांनी कार्य केले. या विचारसरणीमुळे ज्येष्ठ नेते नानासाहेब गोरे, एस्.एम्. जोशी, जयप्रकाश नारायण अशा ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचा संबंध आला. गडहिंग्लज भागात काँग्रेस विरोधी पक्षात राहून कार्य करणाऱ्या जुन्या मंडळीतच त्यांचा समावेश होता. गडहिंग्लज भागात आज विरोधी पक्ष प्रबळ आहे. त्याचे श्रेय दादा पेडणेकर, एस्.एम्. खन्ना या मंडळींच्या कार्याला दिले पाहिजे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत ५-१० एकटे मोजके कार्यकर्ते घेऊन जनतेच्या प्रश्नावर सतत चळवळी करणारे आणि निवडणुकीत एकाकी लढत देत देत जनतेशी जवळीक करून विरोधी पक्ष हळूहळू वाढविण्याचा त्यांचा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. २०-२५ वर्षानंतर या तालुक्यात नगरपालिका आणि या तालुक्याचे आमदारपदही विरोधी पक्षांना मिळाले. त्याचे श्रेय या जुन्या मंडळीच्या कार्याला दिले पाहिजे. गरिबांबद्दल कणव बाळगून अत्यंत तळमळीने कार्य करणारा एक कार्यकर्ता म्हणून ते प्रसिद्ध होते.[१]

गडहिंग्लज नगरपालिका शताब्दी वर्षात नगराध्यक्ष होण्याचा मान प्रा. विठ्ठल बन्ने यांना मिळाला. राष्ट्रसेवादल, पू.साने गुरुजी, लोकनायक जयप्रकाश नारायण यासारख्या थोर नेत्याकडून प्रेरणा घेऊन समाज सेवेत उतरणारे समाजवादी नेते आहेत. देवदासी-स्त्री मुक्ती केंद्राची स्थापना करून स्त्रीविषयक विविध लढे लढविले. भटक्या-जाती जमातीतील लोकांच्या हक्कासाठीही लढे लढविले. सुंदर शहर आणि विकास कामाना चालना देण्यासाठी त्यांनी परिश्रमपूर्वक प्रयत्न केले.

## जनता आघाडीने गडहिंग्लज शहर विकासासाठी केलेली कार्ये

सन १९८५ च्या नगरपालिका निवडणूकीत जनता आघाडीने तीन चतुर्थांशापेक्षा जास्त बहुमत मिळवून सत्ता काबीज केली. जनता आघाडीच्या काळातील अविस्मरणीय घटना म्हणजे गडहिंग्लज नगरपालिकेचा शताब्दी महोत्सव. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. शंकरराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्याचे सद्भाग्य जनता आघाडीस मिळाले.

आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडीने सन १९८५ साली प्रसिध्द केलेल्या जाहिरनाम्यानुसार दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी पुढील विविध कामे केली.

### १) उत्पन्नात वाढ

जकात, घरपट्टी, पाणीपट्टी, बाजार कर, इमारत भाडे, वाचनालय, सांडपाणी विक्री अनुदाने इ. मार्गांनी सन १९८४-८५ साली नगरपरिषदेचे एकूण उत्पन्न ४७,७६,९५९/- रु. इतके होते. दरवर्षी त्यात लक्षणीय वाढ करण्यात आली. सन १९९०-९१ साली एकूण उत्पन्न १,१०,४६,५९२/- रु. इतके वाढविण्यात आले. रु. १४,०३,७६०/- चा जकात कर १९९०-९१ मध्ये रु. ३५,३३,६७४/- इतका वाढला. यात नगरसेवक व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले. अडीच कोटी रु. अधिक अनुदान मिळविण्यात आले. प्रारंभी २२ लाख रुपयाची अनुदाने मिळाली होती.

२) पाणीपुरवठा

गडहिंग्लज शहर हे झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे जुनी पाणीपुरवठा योजना अपुरी ठरु लागली. म्हणून सातत्याने पाठपुरावा करुन नवी पाणीपुरवठा योजना मंजूर करुन घेण्यात आली. सन २०११ पर्यंत या शहराची अपेक्षित लक्षात घेऊन ही १,४९,९२,१००/- रु.ची योजना तयार करण्यात आली. शासकीय अनुदान, विमा निगमकडून कर्ज आणि नगरपरिषदेचा २६,८६,३००/- रु. चा खर्च यांच्या योगे ही योजना आकार घेत आहे. सदर योजनेची बहुतेक सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. या योजनेत पाण्याच्या शुध्दीकरणाचाही अंतर्भाव आहे.

याखेरीज बोअर खुदाई व गरजेप्रमाणे टँकरद्वाराही पाणी-पुरवठा करण्यात येतो. पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहेत.

३) आरोग्य विषयक

डांबरीकरण झालेल्या रस्त्यांची गटारे बांधली. सार्वजनिक संडास व मुता-यांची सोय केली. सांडपाण्याचा निचरा, सांडपाण्यावर बंधारा व शेतीला पाणी देऊन उत्पन्नात भर घालण्यात आलो. डास निर्मूलनासाठी वारंवार औषध फवारणी करण्यात आली. सदृढ बालक स्पर्धा, आरोग्य शिबीरांचे आयोजन, कुटुंब कल्याण कार्यक्रमात सहभाग व विशेष काम.

४) <u>वृक्ष संवर्धन</u>

शहराच्या सौंदर्यात भर पडावी आणि पर्यावरणाचा समतोल रहावा यादृष्टीने जनता आघाडीने १२ हजारांवर वृक्ष लावले.

५) <u>रस्ते</u>

सर्व रस्त्यांचे डांबरीकरण, अरुंद बोळाचे फरशीकरण, नव्या रस्त्यांचा विकास, रस्त्यांच्या कडांची दुरूस्ती करण्यात आली.

६) <u>दिवाबत्ती</u>

मोठया रस्त्यावर तसेच गल्ली बोळातही लाईटची व्यवस्था, त्याचप्रमाणे टयूब लाइट, मर्क्युरी लॅम्प्स व सोडियम व्हेपर्सची व्यवस्था करण्यात आली.

७) <u>दुर्बल घटकांसाठी</u>

भीमनगरात समाजमंदिर, भीमनगर, डोंबारी वसाहत, नाईक, कोरवी व धनगर समाजास भांडी वाटप करण्यात आले. भीमनगर, डोंबरी वसाहत येथे रंगीत टी.व्ही. बसविण्यात आले.

८) <u>क्रीडांगण</u>

नगरपालिकेने डॉ. राम मनोहर लोहिया क्रीडांगण विकसित केले असून तेथे सुसज्ज पॅव्हेलियनही बांधण्यात आले आहे. क्रीडाप्रेमींसाठी ही चांगली सोय उपलब्ध झाली आहे.

९) सार्वजनिक बागा

टिळक उद्यानाखेरीज गांधीनगरमध्ये बाग विकसित केली असून बागांची योग्य ती निगा राखण्याची तरतूद केली आहे.

१०) पुतळे

१९८५ पूर्वीच्या पुतळयांबरोबरच गडहिंग्लजकरांचे श्रध्दास्थान असणारे कै. काळूमास्तर यांचा पुतळा बसविला.

११) ग्रंथालय व वाचनालय

सुसज्ज इमारतीबरोबरच नागरिकांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी, नागरिक बहुश्रुत बनावेत यासाठी प्रयत्न केले. दरवर्षी रु. २५ हजाराहून अधिक किंमतीची मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड पुस्तकांची खरेदी, पू. सानेगुरुजी लोकशिक्षण व्याख्यानमालेचे आयोजन, काव्यवाचन, कथा-कथन, नाटयाभिनय, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन, वाचक संमेलन, स्त्रिया व मुले यांच्या स्वतंत्र विभाग, मागणीप्रमाणे विभागीय १० मोफत वाचनालये सुरु करण्यात आली.

१२) शैक्षणिक कार्य

नगरपरिषदेच्या शिक्षण मंडळामार्फत शहरात प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध आहे. शिक्षण मंडळाने खालीलप्रमाणे कामे पूर्ण केली.

शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, शाळा सुधार योजनेखाली प्रत्येक वर्गात पंखे, तिजो-या, इतर सुधारणा, मुलींच्या शाळेची १२ लाख

स्मयाची नवीन इमारत, गरजू मुलांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप, मुला-मुलींसाठी अभ्यासिका, क्रीडास्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, स्कॉलरशीप परीक्षांचे शिक्षण व प्रत्येक वर्षी जिल्हा पातळीवर स्कॉलरशिप्स, शिक्षकांच्या अडीअडचणींचे निवारण, बालवाडी संचालन इ. विविध कामे करण्यात आली.

१३) <u>नगरपरिषदेच्या नव्या इमारती</u>

जनता खुले नाट्यगृह, क्रीडांगण व पॅव्हेलियन, शॉपिंग सेंटर, सुपर मार्केट, समाज मंदिर, कन्याशाळा, एस्.टी. स्टॅण्ड परिसरात छोट्या व्यापाऱ्यासाठी दुकान गाळे, पंचायत समिती रस्त्यावर छोटे दुकान गाळे, सार्वजनिक स्नानगृह, स्मशानभूमी, पार्क कंपाऊंड बांधकाम इ. कामे करण्यात आली.

१४) <u>नगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी</u>

हंगामी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले. सरकारमान्य वेतनवाढी व इतर फायदे यांची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात आली. चतुर्थ कर्मचारी कर्मचाऱ्यांसाठी गरजेच्या वस्तूंचा पुरवठा, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यापैकी काही कर्मचाऱ्यांना निवासाची सोय, कर्मचाऱ्यांना प्रथमच रु. १,८५,०००/- बोनस वाटप करण्यात आले.

१५) <u>औद्योगिक वसाहत</u>

सदरच्या वसाहतीसाठी जागा ताब्यात घेण्याचे काम सुरू, नवोदित कारखानदारांना तीन वर्षांसाठी कर सवलत देण्यात आली. [१०]

वरीलप्रमाणे जनता आघाडीने गडहिंग्लज शहर विकासाच्या विविध योजना अंमलात आणून स्वच्छ, सुंदर व आदर्श शहर बनावे यासाठी प्रयत्न केले.

## गडहिंग्लज तालुक्यामध्ये नव्या नेतृत्वाचा उदय

१९८५ च्या विधान सभा निवडणुकीमध्ये जनता पक्षातर्फे अॅड. श्रीपतराव शिंदे यांना उमेदवारी मिळाली आणि १९८५ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते गडहिंग्लज विधानसभा मतदार संघातून दोन वेळा आमदार म्हणून निवडून आलेले व २२ वर्षे गडहिंग्लज नगरीचे नगराध्यक्षपद भूषविलेले गडहिंग्लज तालुक्यातील कॉंग्रेस (आय) पक्षाचे ज्येष्ठ नेते डॉ. एस्.एस्. घाळी यांचा पराभव करुन निवडूनही आले. थोड-क्यात एका नवीन नेतृत्वाचा गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणामध्ये उदय झाला. गडहिंग्लज तालुक्याला एक नवीन नेतृत्व मिळाले. गडहिंग्लज तालुक्यातील लोकांच्यामध्ये पुन्हा एकदा नवीन चैतन्य निर्माण झाले. राजकारणात गरुड झेप घेऊन विरोधकांची झोप उडविणारे एक मुरब्बी राजकारणी म्हणून आज श्रीपतराव शिंदे ओळखले जातात. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीतील विजयानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना श्रीपतराव शिंदे म्हणाले की, "माझा हा विजय म्हणजे तालुक्यातील दीन दुबळ्या शेतकरी-शेतमजूर यांचा विजय आहे. या तालुक्याच्या विकासासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन." उपेक्षित, दलित, संघटित अल्पसंख्यांक व समाजातील आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दृष्टीकोनातून मागासलेल्या सर्वसामान्य माणसाचा विकास हा आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे.

## आमदार श्रीपतराव शिंदे यांचे १९८५ ते १९९० या काळातील लोकप्रतिनिधी म्हणून कार्य

लोकशाही तत्वानुसार लोकांनी, लोकांच्यासाठी लोकांच्याकडून चालविलेले राज्य हे ब्रीद वाक्य डोळ्यासमोर ठेवून अनेक ज्वलंत समस्या व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी श्रीपतराव शिंदे यांनी अनेक प्रयत्न केले. मोर्चा आणि श्रीपतराव शिंदे यांचे अतूट नाते आहे. कारण सतत कोणता ना कोणता प्रश्न हातात घेऊन सतत रस्त्यावर असणारा सर्व-सामान्यांचा कार्यकर्ता असे तालुक्यातील जनतेचे मत बनले आहे. देवदासी चळवळ असो, पाणीप्रश्न असो, पूरग्रस्त पुनर्वसनाचा प्रश्न असो, महागाई, बेकारी प्रश्न अशा विविध प्रश्नांचा सतत पाठपुरावा करून विधानसभेत काम करत असतानाच विधानभवनाबाहेरही सनदशीर मार्गाने मोर्चा, निदर्शने, निवेदने यामार्फत अनेक समस्या लोकशाही मार्गाने सोडविता येतात. हे श्रीपतराव शिंदेनी दाखवून दिले आहे. देवदासी चळवळीत त्यांचा सतत पुढाकार असलेला दिसून येतो. म्हणूनच सर्वसामान्य कष्टकऱ्यांचा, दलितांचा , पीडितांचा व सर्वांना बरोबर घेऊन जाणारा नेता असे त्यांना म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. विरोधी पक्षात काम करताना याच मार्गाचा अवलंब त्यांनी केलेला आहे व तालुक्याचा कायापालट घडवून आणला आहे. सर्वसामान्याच्या हक्कासाठी लढणारा रस्त्यावरचा कार्य-कर्ता म्हणून त्यांनी मान्यता मिळविली आहे.[११] १९८५ व १९९० मध्ये गडहिंग्लज मतदार संघातून महाराष्ट्र विधान सभेवर निवडून आले आणि एक जागरूक आमदार म्हणून आपल्या वैशिष्टयपूर्ण कार्याचा वेगळा ठसा विधान सभेत उमटविला.

## विधानसभेत देवदासी प्रथेविरूद्ध पहिल्यांदा आवाज उठविला

आपल्या महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून देशात संबोधले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, कर्मवीर वि.रा. शिंदे,

छत्रपती शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे अशा समाजधुरीणांच्या विचारांचा वारसा सांगणाऱ्या आपल्या राज्यातही देवदासी प्रथा मोठ्या प्रमाणात आहे. देवाच्या नावावर मुला/मुलींना सोडण्याची भयंकर प्रथा कर्नाटक व महाराष्ट्रामध्ये आहे. धर्माच्या नावावर स्त्रियांचे जीवन उद्‌वस्त करणाऱ्या देवदासी प्रथेला बंदी घालावी, देवदासींचे पुनर्वसन करावे या मागण्यासाठी आमदार श्रीपतराव शिंदे यांनी अनेकवेळा मोर्चे काढले. सत्याग्रह, उपोषण इ. माध्यमातून संघर्ष करावा लागला. तथाकथित नेत्यांना हा थट्टेचा विषय झाला होता. पण आमदार श्रीपतराव शिंदेंनी त्याची तमा बाळगली नाही.

१९७५ साली आमदार श्रीपतराव शिंदे यांनी डॉ. बाबा आढाव यांच्या अध्यक्षतेखाली "देशामध्ये प्रथमच" देवदासी परिषद संघटित केली. या प्रथेच्या विरोधात संघटीत लढा उभारण्याची गरज ओळखून आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गडहिंग्लज येथे १९८४ साली महाराष्ट्र राज्य देवदासी निराधार मुक्ती केंद्राची स्थापना केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या इतिहासामध्ये प्रथमच देवदासी प्रश्नावर आमदार शिंदे यांनी चर्चा उपस्थित करून या दुर्लक्षित प्रथेकडे सरकार आम जनतेचे लक्ष वेधून घेतले आणि देवदासी प्रथेच्या निर्मूलनाची व त्यांच्या पुनर्वसनाची मागणी केली. परिणामी महाराष्ट्र सरकारला देवदासींच्या कल्याणासाठी रु. २५ लाखांची तरतूद करावी लागली. याचे श्रेय आमदार श्रीपतराव शिंदे यांनाच आहे. देवदासी चळवळीचे काम रचनात्मक व संघर्षाच्या माध्यमातून पुढे नेत असताना या उपेक्षित देवदासींच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची व्यवस्था व्हावी

यासाठी आमदार शिंदे यांनी महाराष्ट्र राज्य देवदासी निराधार केंद्राच्यावतीने गडहिंग्लज येथे महाराष्ट्रातच नव्हे तर किंबहुना देशामध्ये प्रथमच १९८६ साली पहिल्या "देवदासी छात्र वसतिगृहाची" स्थापना केली.

महाराष्ट्रातील देवदासी मुक्तीची चळवळ वेगाने फोफावत असताना सन १९८९ मध्ये आणखी एक देवदासी परिषद गडहिंग्लज येथे आयोजित करण्यात आली होती. याही परिषदेला मार्गदर्शक म्हणून डॉ. बाबा आढाव उपस्थित होते. या प्रथेची कायद्याने बंदी व्हावी आणि या अभागी स्त्रियांचे पुनर्वसन व्हावे, वृध्द देवदासींना पेन्शन मिळावे, देवदासींच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची मोफत सोय व्हावी इत्यादी अनेक मागण्यांसाठी आमदार श्रीपतराव शिंदे यांनी जाणीवपूर्वक, प्रामाणिकपणे संघर्ष केला आहे. देवदासी प्रश्नाविषयी त्यांची विधानसभेतील सभेतील कामगिरी महत्वपूर्ण आहे. देवदासी भगिनींच्या अंध:कारमय जीवनात निदान पणतीचा प्रकाश देणारा त्यांचा लढा स्तुत्य आहे. आमदार शिंदे देवदासी चळवळीचे अध्वर्यूच आहेत. [१२]

## पाण्याचा जागर - पाणीप्रश्न मार्गी

भारताला स्वातंत्र्य मिळून ४८ वर्षे झाली. परंतु महाराष्ट्राच्या नकाशातील गडहिंग्लज, आजरा आणि चंदगड हे तीन तालुके विकासाच्या दृष्टीने पाण्याअभावी आजही मागासलेले आहेत. गडहिंग्लजला मुख्यत: हिरण्यकेशी नदीमुळे पाणी मिळते. चित्री नदीमुळे आजरा, गडहिंग्लज तालुक्यातील काही भागात पाणी मिळते. या दोन्ही नद्यांच्या पात्रात ६ ते ८ महिने पाणी असते. अनेक गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा

लागतो. शेतकऱ्यांचा बोअर व विहीरींना पाणी नाही. हिरण्यकेशी नदीवर बांधले जाणारे धरण अनेक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण ठरेल. हे ओळखून द्रष्टया इंग्रजांनी सर्व्हे केला व बहुउद्देशीय योजनाही तयार केली होती. इंग्रजांनी तयार केलेली योजना मागे पडली. महाराष्ट्र शासनाने "हिरण्य-केशी-वेदगंगा संयुक्त प्रकल्प" तयार केला. व १० मे, १९६६ साली केंद्र सरकारकडे पाठविला तेव्हापासून तो तिथेच आहे. आंतरराज्य वादाचा घोळ व राजकारण या दोन्हींचेही त्याला ग्रहण लागले. या प्रकल्पामुळे चंदगड, आजरा, गडहिंग्लज, भुदरगड, कागल हे कोल्हापूर जिल्हयातील तालुके, सिंधुदुर्ग जिल्हयातील कुडाळ, सावंतवाडी, मालवण हे तालुके, गोव्यात म्हापसा डिचोली तर कर्नाटकात हुक्केरी व चिक्कोडी हे तालुके पार बदलून जाणार होते. यामुळे सर्व ठिकाणची मिळून १॥ ते २ लाख एकर जमीन ओलिताखाली येणार होती. साडे सत्तेचाळीस लक्ष युनिट वीज तयार होणार होती. उद्योगधंद्याची वाढ होणार होती. १९६६ पासून पुढे काहीच घडले नाही. सन १९७१/७२ मध्ये ॲड. श्रीपतराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हिरण्यकेशी प्रकल्प कृती समिती स्थापन करण्यात आली.

हिरण्यकेशी व लघुपाटबंधारे योजना मागे पडली आणि चित्री प्रकल्पाची योजना पुढे आली. १९७२ साली कृष्णा गोदा लवाद मंडळाने या तीन तालुक्यासाठी सात टी.एम्.सी. पाणी मंजूर केले आहे. पण या तीन तालुक्यात पाण्याचे समान वाटप झाले नव्हते. १९ ऑक्टोबर,१९८७ मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण हे गडहिंग्लजला नगर-परिषदेच्या शताब्दी महोत्सवासाठी आले असताना "चित्री प्रकल्पाची" घोषणा केली. परिणामी २.८.८९ च्या कॅबिनेट बैठकीत या प्रकल्पाला शासकीय मंजूरी देण्यात आली. पाण्याचा प्रश्न धसास लावण्याच्या

दृष्टीने आमदार श्रीपतराव शिंदे व जनता दलाने १९७२ पासून शासन दरबारी पत्रे, निवेदने, प्रसंगी मोर्चे, पाणी परिषदा, धरणे, आंदोलने, उपोषण, प्राणांतिक उपोषण इत्यादी माध्यमातून संघर्ष चालू ठेवला. याचा परिणाम म्हणून तालुक्यामध्ये काही पाझर तलाव, लघुपाटबंधारे योजना व चित्री प्रकल्पाचे काम सुरू आहे. [१३]

सन १९९० च्या विधानसभा निवडणूक काळात पंतप्रधान व्ही.पी. सिंग गडहिंग्लज येथे आले. त्यावेळीही आमदार शिंदे यांनी पाणी प्रश्नी त्यांना निवेदन दिले होते. त्यावेळेपासून या प्रश्नाला गती मिळाली. बराच गाजलेला चित्री प्रकल्प मार्गी लागला. ५० हजारांची टोकन रक्कम मंजूर करण्यात आली. तेरणी लघु पाटबंधारे प्रकल्पास मंजुरी मिळाली. कानडेवाडी, खणदाळ बंधाऱ्यांना वाढीव रक्कम मिळाली. आजरा चंदगडचे प्रकल्पही मार्गी लागले. १९८५ पासून विधीमंडळात आणि बाहेर रस्त्यावर चळवळी करून जनता दल आणि श्रीपतराव शिंदे यांनी पाणी प्रश्न पोटतिडकीने मांडला. लाख सह्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले आणि बेमुदत उपोषणही केले. विरोधी पक्षाचे आमदार म्हणून त्यांच्या प्रयत्नांना मर्यादा होत्या. तथापि जनतेला दिलेल्या आश्वासनवर हुकूम त्यांनी सतत पाणीप्रश्नाचा पिच्छा पुरविला आहे. [१४]

## कुंभारांचा प्रश्न

शेतकऱ्यांप्रमाणेच मातीशी अतूट नातं असणारा कुंभार, किंबहुना माती हेच त्यांचे जीवन असते. परंतु काही वर्षांपूर्वी सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे कुंभारांना माती मिळेनाशी झाली. त्यावेळी "कुंभारांना

माती द्या - नाहीतर आम्हालाही माती द्या" नावाचं एक आगळं आंदोलन आमदार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झाले. गडहिंग्लजच्या प्रांत कचेरी-समोर बेमुदत धरणे सत्याग्रह केला. अखेर शासनाला या आंदोलनाची दखल घ्यावी लागली. अरळी, भडगाव, गडहिंग्लज आणि तालुक्यातील कुंभारांचा माती प्रश्न कायमचा सोडविण्यात आमदार शिंदे यशस्वी झाले. गडहिंग्लज येथील कुंभारांसाठी प्लॉट मिळवून दिला.

## असंघटित भटक्यांच्या न्याय हक्कासाठी लढा

देवदासी प्रश्नाबरोबरच माकडवाले, गोसावी, डोंबारी, मांग-गारूडी यांच्या निवाऱ्याच्या प्रश्नासह त्यांना इतर सोयी सवलती देखील मिळाव्यात, त्यांनाही माणूस म्हणून जगता यावे यासाठी आमदार शिंदेनी वेळोवेळी संघर्ष केला आहे. गडहिंग्लज येथील डोंबारी वसाहत ही त्यांच्या कार्याचे प्रतीक म्हणता येईल. आमदार शिंदे यांच्यामुळेच असंघटित भटक्याना सन्मानाने जगता आले आहे.

## गरीबांचा वाली

गडहिंग्लज तालुक्यातील खणलेहट्टी येथील गरीब युवक श्री. सुतारचा मृत्यू पोलीस कोठडीत झाला. मृतदेह दोन दिवस तालुक्याच्या ठिकाणी पडून होता. जनतेची चौकशीची मागणी हळूहळू विरून गेली. सर्व नेत्यांनी प्रशासनाच्यामागे राहून बोटचेपे धोरण स्वीकारले. परंतु आमदार शिंदे यांनी हा प्रश्न विधानसभेत उपस्थित करून चौकशीचा आग्रह धरला. पोलि-सांच्या अन्यायाच्या विरोधात लढण्याचे धैर्य त्यांनी अनेकवेळा दाखविले आहे.

## मानवता हाच धर्म

माणसा माणसात धर्म, जात पंथाच्या आधारे भेद करणाऱ्या, माणुसकीची नाळ तोडणाऱ्या जातीयवादी, धर्मांध शक्ती विरूद्ध ते सतत लढा देत राहिले आहेत. धर्म किंवा जात यांच्या नावाने संघटना उभी करण्यास त्यांनी नेहमीच विरोध केला आहे. ६ डिसेंबर, १९९२ च्या अयोध्येतील घटनेनंतर देशात अनेक भागात जातीय दंगली झाल्यामुळे जीवित व वित्तहानी मोठया प्रमाणात झाली. माणसांची मने दुभंगली. परंतु गडहिंग्लज तालुक्यात असा एकही प्रकार घडला नाही.[१५]

## आमदार फंडातून केलेली विकास कामे

आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या कार्याची माहिती देताना आमदार फंडातून केलेल्या विकास कामाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मतदार संघातील प्रत्येक गावाशी सातत्याने संपर्क, तेथील जनतेच्या प्रश्नाबाबत असलेली जाण आणि शासकीय योजनांतून कामे करून घेण्याचे कौशल्य यामुळे आमदार श्रीपतराव शिंदे यांचे काम वैशिष्टयपूर्ण असल्याचे जाणवते यात शंका नाही.

आमदार शिंदे यांनी १९८६-८७ यावर्षी आमदार फंडातून १६ कामे मंजूर करून घेतली. त्यावर सुमारे ११ लाख रुपये खर्च करण्यात आले. आमदार फंडातून रस्ते, संरक्षण, जोड रस्ते, दुरूस्ती, डांबरीकरण करणे, समाजमंदिर बांधणे आदी बाबींवर खर्च करण्यात आले. सन १९८७-८८ यावर्षी आमदार फंडातून सुमारे १० लाख रुपये खर्चून १४ कामे करण्यात आली. सन १९८८-८९ सालात ११ कामांवर सुमारे ९ लाख ३० हजार रुपये खर्च करण्यात

आली. सन १९८९-९० सालात ८ लाख ५४ हजार रुपये खर्चून १३ कामे पूर्ण करण्यात आली. त्यामध्ये नूल येथील समाजमंदिर पूर्ण करण्यात आले आहे. सन १९९०-९१ या सालात ३३ लाख १० हजार रुपये खर्च करून १२ कामे पूर्ण करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने दुंडगे-माधाळ रस्त्याचे डांबरीकरण, इतिहास प्रसिध्द सामानगडावर जाण्यासाठी चिंचेवाडी ते सामानगड रस्त्याचे खडीकरण करण्यात आले आहे.

आमदार फंडातून सन १९९१-९२ या वर्षी जखेवाडी व नांगनूर येथे व्यायाम शाळा बांधण्यात आल्या, तर बसर्गे येथे समाजमंदिर बांधण्यात आले. या तीन कामासह एकूण ३२ कामे पूर्ण करण्यात आली. त्यावर सुमारे १३ लाख २९ हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन १९९२-९३ यावर्षी मतदार संघातील तब्बल २९ कामे आमदार शिंदे यांनी आमदार फंडातून करून घेतली. या २९ कामावर ४० लाख ७५ हजार रुपये खर्च करण्यात आले. करंबळी येथे समाजमंदिर, नेसरी येथे समाजमंदिर, झुलपेवाडी (ता. आजरा) येथे साकव आदी प्रमुख कामासह कांही रस्त्यांचे खडीकरण करण्यात आले आहे. सन १९९३ साली आमदार शिंदे यांनी या फंडातून शेंद्री मुत्नाळ, मेटाचा मार्ग आदी चार ठिकाणी समाजमंदिरे बांधली तर औरनाळ, हिरलगे, उत्तूर या गावाना सामाजिक सभागृह बांधले. मुस्लिम स्मशानभूमीमधून दर्ग्यापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचे पायरी व फरशी बसविण्याचे काम आमदार फंडातून केले. सन १९९३ साली २७ लाख ६४
६२ हजार रुपये खर्च करून २४ कामे पूर्ण केली. आमदार श्रीपतराव शिंदे यांनी आमदार फंडातून काम करताना केव्हाही गटातटाचा विचार केला नाही. केवळ आपल्या मतदान संघात गाव असणे एवढीच अट ते पहात असत.

आमदार श्रीपतराव शिंदे हे वरील विविध कामामुळे गडहिंग्लज तालुक्यातील प्रत्येक घरा-घरात पोहचले. जनमानसात आपली एक वेगळी

प्रतिमा व निर्भीड स्वभाव असणारे व स्वच्छ मनाचे, सर्वांचे कार्यकर्ते असा ठसा आज त्यांनी जनमानसात उमटविला. गोरगरीब जनता व अन्यायाने ग्रासलेल्या लोकांना सतत सहानुभूतीने जवळ घेवून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी श्रीपतराव शिंदे हे देवदासी चळवळ, पाणी-प्रश्नी आमरण उपोषण, मोर्चा निदर्शने इ. मार्गाने सतत प्रयत्नशील राहिले. म्हणूनच आज त्यांची प्रतिमा सर्वसामान्य लोकांना दिप-स्तंभासारखी वाटते.

आमदार श्रीपतराव शिंदे यांच्याकडे गडहिंग्लज तालुक्याचे नेतृत्व आल्यापासून तालुक्याच्या विकासाचे स्वप्न साकार झाले आहे. गावोगावी पिण्याच्या पाण्याची सोय, रस्ते, बंधारे, समाजमंदिर, आरोग्यसेवा, शाळा, सांस्कृतिक भवन, एस्.टी.ची सोय इत्यादी विविध कामे करून जनमानसाशी माणुसकीने वागून त्यांनी तालुक्याची सेवा केली आहे. म्हणून दोनवेळा विधानसभेवर निवडून देऊन जनतेने त्यांच्या कार्याची पोचपावती दिली आहे. श्रीपतराव शिंदे यांच्या कार्याकडे पाहिल्यास असे दिसते की, सर्वसामान्य गरीब जनतेच्या जिव्हा-ळ्याच्या व अत्यावश्यक सोयीकडे त्यांनी जास्त लक्ष दिले आहे. लोकशाही मार्गाचा अवलंब करून शासन दरबारी जाग आणून विविध कामे करून घेतली आहेत. [१६]

## विधान सभा निवडणूक सन १९९०

सन १९९० च्या विधानसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा भागात काँग्रेस (आय) ला चांगले यश मिळाले. या निवडणुकीत गडहिंग्लज मतदार संघातून श्रीपतराव शिंदे यांनी दुसऱ्यावेळी विजय

मिळविला. त्यामुळे तालुका राजकारणात त्यांचे स्थान अधिक भक्कम झाले. कोल्हापूर जिल्हयामध्ये कॉंग्रेस (आय)ला अनुकूल वातावरण असतानाही गडहिंग्लज, राधानगरी येथील जागा जनता दलाला मिळाल्या. कोल्हापूर शहर व शाहुवाडीत शिवसेनेला विजय मिळाला. इचलकरंजी येथे मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाने यश मिळविले. इतर ७ मतदार संघात कॉंग्रेस (आय) ने विजय मिळविल्या. कोल्हापूर जिल्हयातील सन १९९० मधील विधान सभा निवडणूक निकाल खालीलप्रमाणे -

**कोल्हापूर जिल्हा विधानसभा निवडणूक निकाल तक्ता - सन १९९०**

एकूण जागा - १२ कॉंग्रेस (आय) - ७

जनता दल - २ शिवसेना - २

मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष - १

| अ.नं. | | उमेदवाराचे नाव | मतदार संघ | पक्षाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. | दिलीप मल्हारराव देसाई | कोल्हापूर शहर | शिवसेना |
| २) | " | के.एल्. मलाबादे | इचलकरंजी | मा.क.प. |
| ३) | " | दिग्विजय खानविलकर | करवीर | कॉंग्रेस(आय) |
| ४) | " | श्रीपतराव बोंद्रे | सांगरूळ | कॉंग्रेस(आय) |
| ५) | " | शंकर धोंडी पाटील | राधानगरी | जनता दल |
| ६) | " | श्रीपतराव दिनकरराव शिंदे | गडहिंग्लज | जनता दल |
| ७) | " | रत्नाप्पा कुंभार | शिरोळ | कॉंग्रेस(आय) |
| ८) | " | जयवंतराव आवळे | वडगाव | कॉंग्रेस(आय) |
| ९) | " | यशवंत एकनाथ पाटील | पन्हाळा-बावडा | कॉंग्रेस(आय) |
| १०) | " | बाबासाहेब पाटील-सरुडकर | शाहुवाडी | शिवसेना |
| ११) | " | सदाशिवराव मंडलिक | कागल | कॉंग्रेस(आय) |
| १२) | " | नरसिंग गुरुनाथ पाटील | चंदगड-आजरा | कॉंग्रेस(आय) |

## गडहिंग्लज विधानसभा मतदार संघ निवडणूक - सन १९९०

गडहिंग्लज तालुका हा काँग्रेस (आय) चा बालेकिल्ला समजला जातो. तालुक्यातील छोटया मोठया सर्वच संस्था काँग्रेस (आय) पक्षाकडे आहेत. तालुक्यातील बहुसंख्य ग्रामपंचायती काँग्रेसकडेच आहेत. काँग्रेस (आय) ची अशी भक्कम अवस्था असली तरी हा पक्ष अंतर्गत गटबाजीने पोखरलेला आहे. डॉ. घाळी यांनी १० वर्षे तालुक्याचे नेतृत्व समर्थपणे केले. सर्वगटांना सांभाळून त्यांनी एकमुखी नेतृत्व दिले. मात्र काँग्रेसमध्ये अन्य नेतृत्व पुढे न आल्याने एकखांबी तंबूसारखी अवस्था झाली होती. डॉ. घाळी यांच्यानंतर गटबाजीने उच्छाद मांडला होता. मुख्यमंत्री शरद पवार यांच्याशी असलेल्या निकटच्या संबंधातून बाबा कुपेकर यांनी तिकिटाची लढाई जिंकली. परंतु तिकिटासाठी इच्छुक असलेले राजकुमार हत्तरगी गट नाराज झाला होता. [१८]

जनता दलामार्फत आमदार श्रीपतराव शिंदे यांना तिकिट मिळाले. काँग्रेस (आय) पक्षातील गोंधळाचा विचार करता जनता दलाची अवस्था चांगली होती. आमदार श्रीपतराव शिंदे यांनी गेल्या ५ वर्षात आमदार म्हणून चांगली कामगिरी बजावली होती. विविध प्रश्नांवर विधानसभेत आवाज उठविला. एक जागृत आमदार म्हणून प्रतिमा निर्माण केली होती. पण विरोधी आमदार म्हणून त्यांच्या कार्याला मर्यादा पडल्या. आमदार फंडातून मतदारसंघात रस्ते, शाळा, इमारती आणि पाणीप्रश्न अशी विविध कामे केली होती. आमदार शिंदे यांच्या कार्यामुळे जनता पक्ष सर्व खेडयात पोहचला होता. जनतेचे प्रश्न घेऊन सतत लढणारा पक्ष अशी जनता दलाची प्रतिमा तयार झाली होती. हे चित्र एका बाजूला असले तरी पक्षबांधणीबाबत मात्र त्यांना यश मिळाले नाही. अनेक सहकारी दुरावले. त्यांचे एकेकाळचे सहकारी प्रा. विठ्ठल बन्ने यांनी

निवडणुकीत त्यांच्या विरोधात होते. तरीसुध्दा आमदार शिंदे यांनी केलेले कार्य चांगले आहे. शिवसेनेमार्फत बाबा कुपेकर यांचे सख्खे बंधू भैय्यासाहेब कुपेकर यांना तिकिट मिळाले होते. या प्रमुख उमेदवारा-शिवाय दूरदर्शी पक्षाचे अक्बर काझी, सदाशिव धनवडे (अपक्ष), भीमाप्पा शिरूर (अपक्ष) हे उमेदवार निवडणूक रिंगणात होते. [१९]

गडहिंग्लज मतदार संघातील अटीतटीच्या निवडणुकीचा प्रचार अंतीम टप्प्यात पोहचला असतानाच काँग्रेस (आय) मधील राजकुमार हत्तरकी गटाने जनता दलाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे संपूर्ण निवडणुकीला कलाटणी मिळाली. सात उमेदवार निवडणूक रिंगणात असले तरी काँग्रेस (आय) आणि जनता दल यांच्यातच खरी लढत होती. अंतीम टप्प्यात जनता दलाच्या बाजूने सर्व फासे पडू लागले. त्यामुळे जनता दलाला विजयासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले.

चारही उमेदवारांच्या प्रचारात या विभागातील पाणी प्रश्नाला महत्व दिले होते. निवडणूक काळात काँग्रेस (आय) उमेदवार बाबा कुपेकर यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री शरद पवार आले होते. बाबा कुपेकर यांनी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या साक्षीनेच पाणी प्रश्नाबाबत घोषणा केली. रेंगाळणारे धरण प्रकल्प जर एका वर्षात मार्गी लागले नाहीत तर आमदारकीचा त्याग करीन असे आश्वासन दिले. भैय्यासाहेब कुपेकर व प्रा. विठ्ठल बन्ने यांनीही पाणी प्रश्नावर जोर दिला होता. जनता दलाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे यांच्या निवडणूक प्रचारासाठी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग गडहिंग्लजला येऊन गेले. आमदार शिंदे यांनी त्यांच्यापुढे पाणीप्रश्नाची समस्या कथन केली. पंतप्रधान व्ही.पी.

सिंग यांच्या दौऱ्यामुळे जनतेत कुतूहल निर्माण झाले होते. मुख्यमंत्री शरद पवार, पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांच्या गडहिंग्लज दौऱ्यामुळे निवडणुकीला वेगळाच रंग आला होता. [२०]

गडहिंग्लज विधानसभा मतदार संघ निवडणूक - १९९० निकाल तक्ता

तालिका

एकूण मतदार - १,४०,४७९ एकूण झालेले मतदार - १,०५,०९९
वैध मते - १,०३,२६७ अवैध मते - १,८३२

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | पक्षाचे नांव | चिन्ह | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. श्रीपतराव दिनकरराव शिंदे | जनता दल | चक्र | ४५,९०१ |
| २) | श्री. कृष्णाराव रखमाजीराव देसाई उर्फ बाबा कुपेकर | कॉंग्रेस(आय) | हात | ४५,२२७ |
| ३) | श्री. भाग्येशराव रखमाजीराव देसाई | शिवसेना | धनुष्य-बाण | ८,८८३ |
| ४) | श्री.प्रा. विठ्ठल सिध्दाप्पा बन्ने | अपक्ष | घोडा | २,०८५ |
| ५) | श्री. भिमाप्पा गुरुसिध्दा शिरुर | अपक्ष | सिंह | ७२६ |
| ६) | श्री. सदाशिव शामा धनवडे | अपक्ष | सायकल | ३२४ |
| ७) | श्री. अक्बर दादामिया काझी | दूरदर्शी पक्ष | उगवता सूर्य | १११ |

वरील निवडणुकीत श्रीपतराव शिंदे ६७४ मतांनी विजयी झाले. जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे हे डॉ. घाळी यांच्याप्रमाणेच

विधानसभेवर दुस-यांदा निवडून आले. श्रीपतराव शिंदे यांनी काँग्रेस अंतर्गत गटबाजीचा फायदा मिळविण्यात यशस्वी ठरले. १९८५ च्या निवडणुकीत बाबा कुपेकर यांनी जी भूमिका वठविली तीच भूमिका या-वेळी राजकुमार हत्तरकी यांनी पार पाडली. काँग्रेसने लादलेला उमेदवार आपण पाडू शकतो हे हत्तरकींनी दाखवून दिले. या निकालाने काँग्रेस पक्षात पुन्हा मोठा धक्का बसला. दुस-यावेळी विजयी होण्याची संधी मिळाल्याने जनता दलाचे तालुक्यात भक्कम पाय रोवले. तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी मिळाली. आजअखेर हा काँग्रेस बालेकिल्ला आता जनता दलाचा बालेकिल्ला बनला.[२१]

## गडहिंग्लज नगरपालिकेचे राजकारण - सन १९९१ ते १९९५

काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून गडहिंग्लज तालुक्याची ओळख होती. हा किल्ला आता ढासळू लागला. वेगाने पडझाड सुरु झाली. नेतृत्वाअभावी काँग्रेस पक्षाची पूर्ण वाताहत सुरु झाली. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत डॉ. एस्.एस्. घाळी यांचा पराभव झाला आणि या अभेद्य किल्ल्याला खिंडार पडले. त्यावेळेपासून काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली. २४ ऑगष्ट, १९८७ रोजी डॉ. घाळी यांचे निधन झाले. त्यानंतर तालुक्यात प्रत्येक कार्यकर्ता आपणच नेता या अविर्भावात वागू लागला. हा बडकल्लींचा गट, हा कुराडेंचा गट, हा हत्तरकींचा गट, हा कुपेकरांचा गट, हा नलवडेंचा गट, सभापती गट, नेते तितके गट झाले आणि काँग्रेस पक्षाचे नाव घ्यायला कोणी तयार नाही. ३०-३५ वर्षे तालुक्यातील सर्वच संस्था काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत. गडहिंग्लज नगरपालिका सोडली तर अन्यत्र कुठेही विरोधकांना थारा मिळाली नाही. "पुलोद" चे राजकारणही येथील काँग्रेस पक्षाला हानिकारक ठरले.

१९८५ साली पुलोद म्हणून बाबा कुपेकर यांनी जनता दलाचे श्रीपतराव शिंदे यांना निवडून आणले. त्याचवेळी तालुका संघातही आघाडी करुन निवडणूक जिंकली. कॉंग्रेसच्या आजच्या दयनीय अवस्थेचे विश्लेषण करताना पार्श्वभूमी लक्षात घेणे जरुरीचे आहे. मध्यंतरी १९८८ साली साखर कारखाना निवडणूक झाली. केवळ आप्पासाहेब नलवडे यांना हटविण्यासाठी कॉंग्रेसचे सर्व गट आणि जनता दलाची मंडळी एकत्र आली. कारखाना जिंकला. मात्र येथे गटबाजीने उच्छाद मांडला आहे.

फेब्रुवारी, ९० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीने तर कॉंग्रेस (आय) पक्षाची आणखी छकले केली. उमेदवारी बाबा कुपेकर यांना मिळाली म्हणून राजकुमार हत्तरकी यांनी सर्व शक्ती पणाला लावून बाबा कुपेकर यांना पराभूत केले. हत्तरकीच्या निर्णयाने कॉंग्रेस पक्ष आणखी खिळखिळा झाला. जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांना विजयी करण्याचे श्रेय हत्तरकींनी आपल्या खात्यावर नोंदवून घेतले. १९९० च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत ७० पैकी ५५ ग्रामपंचायती कॉंग्रेसने जिंकल्या. ग्रामीण भागातील जनता कॉंग्रेस पक्षाच्या पाठीशी आहे, हे सिध्द झाले. मात्र नेतृत्वाअभावी कार्यकर्ते भरकटत आहेत, सर्व गटांना एकत्र करुन पक्षाची पुनर्बांधणी आवश्यक असली तरी तेवढया कुवतीचा एकही नेता नाही ही वस्तुस्थिती आहे.

कॉंग्रेसमध्ये निर्माण झालेल्या या परिस्थितीचा फायदा विरोधी पक्षाची मंडळी घेत आहेत. एक एक कार्यकर्ता आपल्या छावणीत घेऊन ताकद वाढवीत आहेत. एकेकाळचा बालेकिल्ला अशा तऱ्हेने ढासळत

असताना जिल्हा कॉंग्रेसचे नेते कुठे गडप झाले आहेत ? या भागातून कॉंग्रेसच्या नावावर विक्रमी मते घेणारे खासदार कुठे आहेत ? पराभूत झालो तरी तालुक्यात कॉंग्रेसचे कार्य करण्याची घोषणा करणारे बाबा कुपेकर कुठे आहेत ? हे कॉंग्रेसच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचे प्रश्न आहेत. मात्र त्यास उत्तरे मिळत नाहीत. स्थानिक पातळीवर अनेक गट आणि त्यांचे नेते ऐकमेकांवर कुरघोडी करण्यात मग्न आहेत. आपल्या वर्तणुकीने कॉंग्रेस पक्षाची वाताहत होत आहे याचा विचार करायला कोणी तयार नाही. तालुका कॉंग्रेस (आय) चे अध्यक्ष बसगोंडा पाटील आणि इतर पदाधिकारी केवळ कागदोपत्री आहेत. परिस्थिती सावरण्याची कुवत त्यांच्यात नाही, असे राजकीय निरीक्षकाचे मत आहे. अशा त-हेने एकेकाळी बालेकिल्ला म्हणून परिचित असलेला हा तालुका कॉंग्रेसच्या दृष्टीने इतिहास जमा होत आहे. या किल्ल्यात गटबाजीची खिंडारे पडली आहेत. किल्ल्याचे बुरूज ढासळत आहेत. २२ गडहिंग्लज तालुक्यात शह काटशहाच्या राजकारणाला सुरवात झाली. कॉंग्रेसांतर्गत असणारे गट सोयीनुसार विरोधकांशी हात मिळवून आपल्याच पक्षातील दुस-या गटाला नामोहरण करत राहिले.

## गडहिंग्लज नगरपालिका निवडणूका सन १९९१

२४ नोव्हेंबर, १९९१ रोजी गडहिंग्लज नगरपालिकेची निवडणूक झाली. विधानसभा निवडणुकीनंतर नगरपालिकेची निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीत जनता दलाचे आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडी निवडणूक रिंगणात जोमाने उतरली. याच दरम्यान गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणात काही महत्वपूर्ण बदल झाले. नोव्हेंबर महिन्यात नगरपालिका निवडणूका घेण्याचे शासनाने

घोषणा केल्याने शहरात निवडणूक हालचाली सुरु झाल्या. काँग्रेस (आय) आणि जनता दल या प्रमुख पक्षांच्या कार्यकर्त्यांनी निवडणुकीची तयारी चालविली. विभागवार इच्छुकांच्या नावाची यादी करणे, उमेदवारांची चाचपणी याबरोबरच मतदारांशी संपर्क वाढविण्याच्या हालचाली सुरु झाल्या. यावेळी पूर्ण तयारीने पालिका निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्धार काँग्रेस (आय) पक्षाने केला. त्याला अनुसरून मोर्चेबांधणी सुरु केली.

गडहिंग्लज नगरपालिकेत गेल्या निवडणुकीत जनता दलाच्या जनता आघाडीने बहुमत मिळविले. जनता आघाडीचे नेते आमदार श्रीपतराव शिंदे यांनी दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा सुरु ठेवली. गेल्या निवडणुकीत पालिकेत काँग्रेस(आय) चे सहा नगरसेवक असून त्यांचा फारसा प्रभाव नव्हता. जनता आघाडी सर्वेसर्वा होती. परंतु जनता आघाडीत तीव्र मतभेद होते. दादा पेडणेकर यांना अविश्वास ठराव आणून काढण्यात आले, तर प्रा. विठ्ठल बन्ने मुदतवाढ हवी होती, तथापि ती नाकारून शिवाजीराव खणगावे यांना संधी देण्यात आली. गेल्या दीड दोन वर्षात जनता आघाडीच्या नेतृत्वाखालील पालिकेत मोठा विस्कळीत-पणा आला होता. प्रा. विठ्ठल बन्ने यांचे नंतरच्या काळात जनता आघाडीशी मतभेद होऊन शेवटी त्यांनी काँग्रेस (आय) ची छावणी गाठली. सुपर मार्केट, पॅव्हेलियन, समाज मंदिर, कन्या शाळा इमारत अशी कांही ठळक कामे जनता आघाडीने गेल्या पाच वर्षात केली आहेत. मात्र सुधारित पाणी योजनेचे काम अंतिम टप्प्यात रखडत पडले. आघाडी-तील मतभेदाप्रमाणेच नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्यातील वादही काही वेळा विकोपाला गेले. पाच वर्षात पंधरा मुख्याधिकारी झाले. या गोष्टींचाही विकासावर परिणाम झाला. जनता आघाडीच्या

नेत्यांनी जाणीवपूर्वक सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्यांना नगराध्यक्ष पद देण्याचा निर्णय राबविला, हे एक वैशिष्टय म्हणावे लागेल. पाच वर्षांचा कारभार तसे पाहिले तर चाकोरीबध्द झाला. जनता दलाच्या हातातील पालिकेची सूत्रे पूर्ववत आपल्या हाती घेण्याच्या जिद्दीने काँग्रेस (आय) पक्ष निवडणूक मैदानात उतरला, तर काँग्रेस (आय) ला पुन्हा येथे शिरकाव धायचा नाही म्हणून जनता दलाने मोर्चे बांधणी सुरु केली.[२३] आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडी निवडणूक रिंगणात होती. तर बाबा कुपेकर यांनी विधानसभा निवडणूकीतील पराभवाचा वचपा काढण्यासाठी नगरपालिका निवडणूकीत काँग्रेस (आय) प्रणित शाहू आघाडीची स्थापना केली. या निवडणूकीत हत्तरकी गटाने आमदार शिंदे यांच्या सत्तारुढ जनता आघाडीशी हातमिळवणी केली. यावेळी यांच्या ५ हत्तरकी गट अधिक २२ जनता आघाडी अशा जागा वाटप झाल्या. पालिकेत २७ जागासाठी निवडणूक होणार होती.

## नगरपालिका निवडणूक पार्श्वभूमी

सन १९९१ साली झालेल्या निवडणूकीचे चित्र मोठया गोंधळाचे होते. याचे प्रमुख कारण म्हणजे मोठया संख्येने उमेदवार निवडणूक रिंगणात होते. सत्तारुढ जनता आघाडी आणि काँग्रेस (आय) च्या पुढाकाराने स्थापन झालेली राजर्षि शाहू आघाडी या दोन आघाडयांशिवाय अपक्ष मंडळीही मोठया प्रमाणात रिंगणात होती. युवकांचा विशेष भरणा होता, हे विशेष नोंद घेण्यासारखे आहे.

गेल्या निवडणूकीत काँग्रेसप्रणित नगरविकास आघाडीची अवस्था मोठी चिंतेची होती. यावेळी मात्र सत्तारुढ आघाडीवर ही वेळ

आल्याची दिसते. दोन वॉर्डात सत्तारूढ आघाडीने अपक्षांना पाठिंबा दिला. हत्तरकी गटाचे काही उमेदवार सामावून घेतले. काँग्रेसच्या शाहू आघाडीकडे उमेदवारी मागणाऱ्यांची संख्या मोठी होती, नेमकी हीच नेत्यांना डोकेदुखी झाली. शाहू आघाडीच्या उमेदवारी यादीबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला. यातून अनेक वार्डात बंडखोरी झाली. शाहू आघाडीत भाजन-शिवसेना यांना सामावून घेण्यात आले. तडजोड म्हणून त्यांना पाच जागा द्याव्या लागल्या. माजी नगराध्यक्ष प्रा. विठ्ठल बन्ने यांची तीव्र इच्छा असूनही त्यांना माघार घ्यावी लागली. राजर्षि शाहू आघाडीला प्रथमपासून चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र उमेदवारी निवडीवरून बंडखोरी आणि असंतोषाला तोंड देण्याची वेळ आली.

गेल्या १९८५ च्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीतून निवडून आलेले इब्राहिम अब्दुल बेडक्याळे यावेळी जनता आघाडीचे उमेदवार होते, तर जनता आघाडीने तिकिट नाकारल्याने सौ. अरुणा शिंदे अपक्ष म्हणून रिंगणात होत्या. जनता आघाडीचे माजी नगराध्यक्ष भिकाजीराव मोहिते, शिवाजीराव खणगावे, भीमराव नेवडे, माजी उपनगराध्यक्ष बाळासाहेब मोरे, सुरेश देशपांडे, डॉ. वसंत पेडणेकर, सखाराम देवार्डे यांना उमेदवारी दिली नाही. यातील काही वॉर्ड महिला राखीव झाल्यामुळे त्यांच्या पत्नींना उमेदवारी देण्यात आली.

पाणीपुरवठा, रस्त्यांचे डांबरीकरण इ. प्रश्नाबाबत जनतेतून नाराजी होती. शाहू आघाडीतील बंडखोरीमुळे निवडणुकीचे चित्र मोठ्या गोंधळाचे होते. २७ वॉर्डात ९८ उमेदवार रिंगणात होते. यातील दोन वॉर्डातील उमेदवार न्यायालयात गेले होते. २४ नोव्हेंबरला २५ वॉर्डात होणाऱ्या निवडणुकीसाठी ९० उमेदवार रिंगणात होते. त्यात २२ महिला उमेदवार होत्या. या निवडणुकीत एकूण मतदार १४,९४२ असून १,३६२ नवीन मतदार होते. २४

## गडहिंग्लज नगरपालिका निवडणूक सन १९९१ - निकाल

गडहिंग्लज नगरपरिषदेच्या अटीतटीच्या निवडणुकीत २५ पैकी १६ जागा जिंकून राजर्षि शाहू शहर विकास आघाडीने सत्तारूढ जनता आघाडीची सात वर्षांची नगरपालिकेतील सत्ता संपुष्टात आणून नगरपालिका ताब्यात घेण्यात यश मिळविले.

शाहू आघाडीमार्फत उभे राहिलेले श्री. डी.एस्. कदम आणि सौ. पूजा घुगरे हे दोन विद्यमान नगरसेवक पुन्हा निवडून आले. तर जनता आघाडीतर्फे निवडणूक लढविणारे नगराध्यक्ष दत्ताजीराव बरगे आणि बापूसाहेब म्हेत्री हे दोन विद्यमान नगरसेवक निवडून आले असून अण्णाराव तेलवेकर व इब्राहीम बेळकयाळ हे विद्यमान नगरसेवक पराभूत झाले. या निवडणुकीत निवडून आलेल्या २५ पैकी २१ चेहरे नवीन होते.

जनता आघाडीचे तालुका सेक्रेटरी अक्बर मुल्ला व नगरसेवक अण्णा तेलवेकर यांचे पराभव जनता आघाडीला अनपेक्षित धक्का देणारे होते. तर अवघ्या चार मतानी पराभव पत्करावा लागलेले प्रा. शिवानंद कट्टीकर व उदाय कुलकर्णी यांचा पराभव शाहू आघाडीस धक्का देणारा होता. या निवडणुकीचा निकाल खालील प्रमाणे -

नगरपालिका निवडणूक सन १९९१ - निकाल तक्ता

तालिका

एकूण मतदार - १४,९४२ वैध मते - ५,९०४

| अ.नं. | उमेदवाराचे नांव | वॉर्ड नंबर | आघाडीचे नांव | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|
| १) | सौ. मंजूषा किरण कदम | १ | शाहू आघाडी | ३०३ |
| २) | श्री. धोंडीराम संताजी कदम | २ | -"- | १९२ |
| ३) | सौ. सुगंधा दशरथ कांबळे | ३ | जनता आघाडी | २५८ |
| ४) | श्री. ताजुद्दीन लतिफसो सौदागर | ५ | शाहू आघाडी | २६२ |
| ५) | श्री. राजन जनार्दन पेडणेकर | ६ | -"- | २९९ |
| ६) | सौ. पूजा अमरनाथ घुगरे | ७ | -"- | २७० |
| ७) | श्री. बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री | ८ | जनता दल | १९१ |
| ८) | " राजेंद्र नागाप्पा हत्ती | ९ | शाहू आघाडी | २४८ |
| ९) | " गुरुसिंगप्पा ईश्वर हिरेमठ | ११ | अपक्ष | १२९ |
| १०) | सौ. जयश्री अशोक भुसारी | १२ | शाहू आघाडी | २२५ |
| ११) | श्री. वसंत रामचंद्र यमगेकर | १३ | -"- | २८६ |
| १२) | सौ. लिलावती बाळासाहेब मोरे | १४ | जनता दल | २७५ |
| १३) | श्री. आप्पासाहेब लिंगाप्पा तराळ | १५ | शाहू आघाडी | २८३ |
| १४) | " दत्तात्रय संतराम बर्गे | १६ | जनता आघाडी | ३३२ |
| १५) | " भुजंगा सिद्दाप्पा नेवडे | १७ | -"- | १९२ |
| १६) | " रघुनाथ रामचंद्र चव्हाण | १८ | शाहू आघाडी | २०३ |
| १७) | सौ. सुरेखा सदाशिव केसरकर | १९ | -"- | २४१ |
| १८) | श्री. दादू शिवगोंडा पाटील | २० | जनता आघाडी | ३१५ |
| १९) | " चंद्रशेखर बसवाणी खन्ना | २१ | शाहू आघाडी | १८१ |
| २०) | सौ. ज्योती प्रकाश देशपांडे | २२ | -"- | २२८ |
| २१) | श्री. संग्रामसिंह आप्पासो नलवडे | २३ | -"- | २९१ |
| २२) | सौ. स्नेहलता नंदकिशोर देशपांडे | २४ | -"- | ११७ |
| २३) | श्री. महादेव अपय्या पाटील | २५ | -"- | १७५ |
| २४) | श्री. विलास दशरथ चोथे | २६ | जनता आघाडी | १९० |
| २५) | श्री. शंकर बाळू रणदिवे | २७ | -"- | २१८ |

सन १९९१ मध्ये मोठया चुरशीच्या निवडणुकीत सत्तारूढ जनता आघाडीस पराभूत करून मतदारांनी सत्तांतर घडविले. हे सत्तांतर तालुक्याच्या राजकारणाला कलाटणी देणारे ठरले. गेली सात वर्षे पालिकेची सूत्रे विरोधी जनता आघाडीकडे होती. २२ वर्षे नगराध्यक्षपद भूषविणाऱ्या डॉ. एस.एस. घाळी यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेली पालिका विरोधी पक्षांनी जिंकून कॉंग्रेसला पहिला धक्का दिला. १९८५ च्या विधानसभेच्या निवडणूकीत कॉंग्रेसचा पराभव करून जनता दलाचे श्रीपतराव शिंदे विजयी झाले. १९८५ आणि १९९० अशा दोन्ही वेळा त्यांनी कॉंग्रेस उमेदवाराचा पराभव केला. या धक्क्या पाठोपाठच साखर कारखाना राजकारणातही आमदार श्रीपतराव शिंदे यांनी बाजी मारली. कारखान्याची सत्तासूत्रे हाती घेतली. सर्व प्रमुख सत्तासूत्रे विरोधी पक्षाकडे गेली. ही कॉंग्रेस (आय) नेते आणि कार्यकर्त्यांना मोठी बोच होती. ही पार्श्वभूमी लाभलेल्या या पालिका निवडणुकीत कॉंग्रेस (आय) पक्षाने नगरपालिका जिंकायची म्हणून निर्धाराने तयारी केली. ज्येष्ठ नेते बाबासाहेब कुपेकर दोन आठवडे गडहिंग्लजला तळ ठोकून निवडणुकीची सूत्रे सांभाळीत होते. राजकुमार हत्तरगी गट वगळता कॉंग्रेसची सर्व मंडळी कुपेकरांच्या नेतृत्वाखाली एकत्र आली होती. निवडणुकीच्या धामधुमीतच चित्री पाटबंधारे प्रकल्पाचा प्रश्न गाजला. बाबा कुपेकर १८ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणाला बसणार होते. पण दरम्यानच्या काळातच राज्यशासनाने २५ लाखांचा निधी मंजूर केल्याचे जाहीर केले. त्यानंतर कुपेकरांचे उपोषणही झाले नाही. या प्रश्नाचा पालिका निवडणुकीत मोठया कौशल्याने उपयोग करून घेण्यात कुपेकर यशस्वी ठरले. चित्री पाणी प्रश्नी शहरातून विजयी मिरवणूक काढण्यात आली. प्रचारात हा मुद्दा जोरदारपणे मांडला. त्याचाही मतदारांवर कांही अंशी परिणाम झाला.

पालिका निवडणुकीत सत्तांतर घडविण्यात बाबासाहेब कुपेकर हे शिल्पकार होते. कॉंग्रेसच्या मंडळीनाही यशाबद्दल साशंकताच होती.

भाजप-शिवसेना युतीला राजर्षि शाहू आघाडीत सहभागी करून घेतले. चार जागा त्यांनी जिंकल्या. ही युती टीकेचा विषय ठरली होती. मतदारांनी मात्र शाहू आघाडी म्हणून मतदान केले.

या निवडणुकीत हत्तरकी गटाने आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या सत्तारूढ आघाडीशी हातमिळविणी केली. जनता आघाडीने २२ आणि हत्तरकी गटाने ५ असे या युतीमार्फत २७ जागा लढविल्या. राजर्षि शाहू आघाडीने २७ पैकी १७ जागा जिंकल्या. हत्तरकी गटाचे सर्व पाचही उमेदवार पराभूत झाले. जनता आघाडीला पराभूत करून राजर्षि शाहू नगर विकास आघाडीने नगरपालिकेची सत्ता हस्तगत केली.[२६]

## गडहिंग्लज नगरपालिका राजकारण सन १९९१ ते १९९५

कॉंग्रेस (आय) चे बाबासाहेब कुपेकर यांच्या नेतृत्वाखाली राजर्षि शाहू नगर विकास आघाडीने सत्ता प्रस्थापित केल्यानंतर श्री. धोंडीराम कदम यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली. १७ डिसेंबर, १९९१ ते २१ मे, १९९३ या काळात त्यांनी नगराध्यक्षपद सांभाळले. श्री. धोंडीराम कदम हे गडहिंग्लजमधील सुप्रसिद्ध व्यापारी आहेत. त्यांनी त्यांच्या काळात नगरविकासाच्या दृष्टीने चांगले कार्य केले. गडहिंग्लज येथील सर्व शैक्षणिक संस्थांना त्यांनी भरघोस मदत केली आहे. शिवराज कॉलेजला त्यांनी दोन लाख रुपयाची उदार देणगी दिली आहे. गडहिंग्लजमधील अनेक संस्थांशी त्यांचा जवळचा संबंध आहे. कर्मवीर विठ्ठल रामजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, सध्या अध्यक्ष, मराठा मंडळाचे अध्यक्ष, शिवाजी को-ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष अशा विविध संस्थांशी निकटचा संबंध आहे. १९७४ पासून त्यांनी नगरसेवक म्हणून काम केले आहे.[२७]

श्री. धोंडीराम कदम यांच्यानंतर ८ जून, १९९३ रोजी श्री. राजन पेडणेकर यांची नगराध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांची कारकिर्द गडहिंग्लज नगरपालिकेच्या इतिहासातील एक वादग्रस्त नगराध्यक्ष म्हणून नोंदली गेली. त्यांच्या काळात नगरपालिकेच्या लोकप्रतिनिधी सत्तारूढ व विरोधी गटातील संघर्षापेक्षा सत्तारूढ शाहू आघाडी अंतर्गत परस्परांना शहाला काटशह देण्याचे राजकारण सुरू झाले. प्रशासन कार्य ठप्प बनले. जनतेच्या सुविधाकडे दुर्लक्ष झाले. आंधळं दळतयं कुत्रं पीठ खातयं अशा विचित्र परिस्थितीत नगरपालिका कार्यरत आहे. केवळ कर वसुली म्हणजे नगरपालिकेचे काम संपले अशी प्रशासन व नगरसेवकांची समजूत झाली आहे. रस्त्यांची दुर्दशा आहे. शहरातील कच-यांचे ढीग, गटारांची अवस्था, विस्तारीत शहरातील काँग्रेस गवत याकडे पूर्णपणे दुर्लक्ष, दिवाबत्तीची गैरसोय, आरोग्यविषयक सुविधांची गैरसोय, पाणीपुरवठा अद्याप सुरळीत न झाल्याने शहवासियात असंतोष कायम आहे.

या दैनंदिन नागरी सुविधाकडे लक्ष केंद्रीत करण्याऐवजी आपली खुर्ची कशी अबाधित राहील याचीच विवंचना नगराध्यक्ष व नगरसेवकांना लागली आहे. गेली अडीच तीन वर्षे भांडणाशिवाय कोणतेही काम नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून झालेले नाही. आघाडयांच्यावतीने दिलेल्या वचनपूर्तींच्या जाहिरनाम्यांना केराची टोपली दाखवून राजकीय सूड उपसण्याचे काम सुरु झाले. जून, ९४ मध्ये मुदत संपूनही नगराध्यक्षांनी राजीनामा दिला नाही. पालिकेचे काम करताना कोणत्याही नगरसेवकाला विश्वासात घेतले जात नाही असा आरोप ठेवून तीन नगरसेवकांनी शाहू आघाडीला रामराम ठोकला. नगरपालिकेच्या अंदाधुंद कारभाराची चौकशी व्हावी म्हणून जिल्हाधिका-याकडे मागणी करण्यात आली. नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्यातील वादही विकोपाला गेला.[२८]

नगराध्यक्ष राजन पेडणेकर यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून उपनगराध्यक्षा सौ. ज्योती देशपांडे यांनी राजीनामा दिला. नगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप-शिवसेनेने शाहू आघाडीत सहभाग देऊन निवडणूक लढविली. नगराध्यक्ष राजन पेडणेकर यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवण्यास राजर्षि शाहू आघाडीची सुकाणू समिती असमर्थ ठरली आहे. काँग्रेस पक्षाच्या गलिच्छ राजकारणामुळे विकास कामे ठप्प झाली. नागरिकांना प्राथमिक सुविधाही मिळू शकल्या नाहीत. नगराध्यक्षांनी जनतेच्या भावनेची कदर केलेली नाही. म्हणून उपनगराध्यक्षा सौ. ज्योती देशपांडेनी राजीनामा दिला. जवळजवळ एक वर्षभर नगराध्यक्ष अल्पमतात राहूनच काम करीत राहिले. यापूर्वीच सौ. पूजा घुगरी, चंद्रशेखर खन्ना, राजेंद्र हत्ती, महादेव पाटील या चौघांनी शाहू आघाडीतून बाहेर पडून बंडखोर गट तयार केला होता. २९ उपनगराध्यक्षाच्या राजीनाम्यामुळे शाहू आघाडीला दुसऱ्यांदा खिंडार पडले.

गडहिंग्लज नगरपालिकेच्या विविध विषय समितीसाठी झालेल्या निवडणुकीत सत्तारूढ राजर्षि शाहू आघाडीला एकही समिती किंवा सभापतीपद आपल्याकडे राखण्यात अपयश आले. या निवडणुकीत विरोधी जनता आघाडी व सत्ताधारी असंतुष्ट गटाने एकी करून सर्व समित्यासह सभापतीपद सत्तारूढ पक्षाकडून हिरावून घेतले. त्यामुळे नगराध्यक्ष राजन पेडणेकर अल्पमतात आले. नगराध्यक्ष राजन पेडणेकराचे राजकारण या ना त्या कारणाने सतत गाजत राहिले. दि. ८ जून, ९३ रोजी नगराध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर विरोधी नगरसेवकांनी त्यांच्या विरोधात मोर्चा व उपोषण करून जोरदार मोहिम उघडली. खास सभा वादळी ठरू लागल्या. आरोप-प्रत्यारोप, शिवीगाळ अशा घटनांनी पालिका बदनाम झाली. शहर विकासाचा खेळखंडोबा झाला. पेडणेकर पदावरून दूर

झाल्यास आपल्या हातून सत्ता जाईल या भीतीने शाहू आघाडी व बाबा कुपेकर मूग गिळून गप्प बसले होते.[30] एक वर्षासाठी निवड होती तरीही पेडणेकरांना तीन वर्षे काम करण्याची संधी मिळाली. शेवटी अल्पमतात आल्यामुळे अविश्वास ठराव दाखल करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असतानाच दि. ९ जानेवारी, १९९६ रोजी राजन पेडणेकर यांनी नगराध्यक्ष-पदाचा राजीनामा सादर केला. अशाप्रकारे एका वादळी कारकिर्दीवर पडदा पडला.

## आमदार श्रीपतराव शिंदे आणि नगरपालिका

जनता पक्षामार्फत गडहिंग्लज नगरपालिका निवडणुकीत जनता आघाडीची स्थापना करण्यात आली. जनता आघाडीच्या निवडणुकीची सूत्रे आमदार श्रीपतराव शिंदे यांच्याकडे होती. १९७४ निवडणुकीत जनता आघाडीने बहुमत प्राप्त केले होते. परंतु नगराध्यक्ष निवडीच्या थेट जनतेमधून नगराध्यक्ष निवड या महाराष्ट्र शासनाच्या धोरणामुळे नगरपालिकेत अल्पमत असतानाही डॉ. एस्.एस्. घाळी काँग्रेस (आय) चे नगराध्यक्ष झाले. एप्रिल, १९८५ मध्ये नगरपालिका निवडणूक अतिशय चुरशीची झाली. मार्च, १९८५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाचे उमेदवार श्रीपतराव शिंदे विजयी झाले. आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडी स्थापन करण्यात आली. या निवडणुकीत जनता आघाडीने २१ पैकी १६ जागा जिंकून पालिकेत सत्तांतर घडवून आणले. नोव्हेंबर, १९९१ च्या नगरपालिका निवडणुकीपर्यंत सात वर्षे पालिकेची सत्ता याच जनता आघाडीकडे होती. या काळात विकास कामे झाली आहेत. विशेष म्हणजे सामान्यातले सामान्य कार्यकर्ते भिकाजीराव मोहिते, भीमराव नेवडे, दत्ताजी बरगे, शिवाजीराव खणगावे अशी मंडळी

नगराध्यक्षपदावर बसू शकली. आमदार शिंदे यांनी प्रत्येक वर्षी नगराध्यक्ष निवडीची प्रथा सुरु केली. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना नगराध्यक्ष होण्याची संधी मिळाली.

१९८५ ते १९९१ या काळात आमदार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडीचे वर्चस्व होते. आमदार शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जनता आघाडी सत्तेवर असल्यामुळे नगरपालिकेच्या माध्यमातून शहर विकासाची काही कामे आमदार शिंदे यांना करता आली. गडहिंग्लज तालुक्याच्या राजकारणाप्रमाणे गडहिंग्लज शहर राजकारणावरही वर्चस्व प्रस्थापित करता आले. परंतु आघाडीत काही मतभेद होते. दादा पेडणेकर यांना अविश्वास ठराव आणून काढण्यात आले. १९५२ पासून शेवटपर्यंत ते गडहिंग्लज नगरपरिषदेत सदस्य होते. शेवटी त्यांचे जनता आघाडीशी मतभेद झाले. त्यांनी २५-३० वर्षे ज्या पक्षात घालविली त्या पक्षाचा त्याग केला. आमदार श्रीपतराव शिंदे यांचे एक सहकारी माजी नगराध्यक्ष प्रा. विठ्ठल बन्ने यांचेही जनता आघाडीशी मतभेद होऊन शेवटी त्यांनी काँग्रेस (आय) पक्षात प्रवेश केला.

सन १९९१ च्या निवडणुकीत जनता आघाडी विजयी होईल हा आत्मविश्वास घेऊन आमदारांसह ज्येष्ठ कार्यकर्ते होते. परंतु हा विश्वास त्यांना नव्हता. जनता आघाडीने चांगली कामे केली असली तरी पाणी योजना, रस्त्याचे डांबरीकरण असे काही प्रश्न जनता आघाडीला अडचणीचे ठरले. जनता आघाडीत काँग्रेसच्या हत्तरकी गटाचे काही उमेदवार सामावून घेतले तर काही उमेदवारांना बाहेरुन पाठिंबा दिला. संपूर्ण पॅनेल उभे केले नाही. तरीसुध्दा आमदार शिंदे यांना तालुका राजकारणावर प्रभाव निर्माण करण्यासाठी नगरपालिकेचा चांगला उपयोग झाला. सन १९९०

च्या विधानसभा निवडणुकीतही आमदार शिंदे यांनी विजय संपादन करून तालुका राजकारणात पुन्हा आपले वर्चस्व सिध्द केले. त्यापाठोपाठ गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन होण्याची संधीही आमदार शिंदे यांना मिळाली.

## गडहिंग्लज नगरपालिका आणि काँग्रेस पक्षाचे राजकारण

गडहिंग्लज नगरपालिकेत अनेक वर्षे काँग्रेस पक्षाचीच सत्ता असल्याची आढळते. काँग्रेस पक्षाने फक्त एकदाच काँग्रेसच्या नावाने निवडणुका लढविल्या. त्यानंतरच्या निवडणुका मात्र नगरविकास आघाडी स्थापून त्याद्वारे लढविल्या. विशेष म्हणजे डॉ. एस.एस. घाळी यांनी तब्बल २२ वर्षे नगराध्यक्षपद भूषविले. नगरपालिकेच्या इतिहासात आपले एक महत्वपूर्ण स्थान प्राप्त केले. १९६० पासून काही काळ अपवाद वगळता १९८१ पर्यंत डॉ. घाळी हेच नगराध्यक्ष होते. नगरपालिकेची सत्ता असल्यामुळे डॉ. घाळी यांना तालुका राजकारणात महत्व प्राप्त झाले. १९७८ व १९८० या दोन वेळी त्यांनी विधानसभा निवडणूक गडहिंग्लज मतदार संघातून जिंकली. नगरपालिकेच्या माध्यमातून त्यांनी शहरविकासाची अनेक कामे केली. विधान सभा निवडणूकीत गडहिंग्लज शहरातून त्यांना भरघोस पाठिंबा मिळाला. १९८१ ते १९८५ या काळात नगरपालिकेत प्रशासकीय कारकिर्द होती. एप्रिल,१९८५ साली नगरपालिका निवडणूका झाल्या. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नगरविकास आघाडी स्थापून निवडणुका लढविल्या. परंतु या निवडणुकीत काँग्रेस प्रणित नगरविकास आघाडीला अपयश आले. काँग्रेस नगरविकास आघाडीला केवळ २१ पैकी ५ जागा मिळाल्या. नगरपालिकेत अनेक वर्षे असलेली काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली.

सन १९८५ ते १९९१ या काळात काँग्रेस पक्ष हा पालिका राजकारणापासून जवळ जवळ उदासीन होता. या काळात त्याचा विशेष प्रभाव नव्हता. नोव्हेंबर, १९९१ मध्ये नगरपालिका निवडणूका झाल्या. १९८५ च्या विधानसभा आणि नगरपालिका निवडणुकीने जनता पक्षाने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का होता. तसेच १९९० च्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेस (आय) चे उमेदवार बाबासाहेब कुपेकर पराभूत झाले. तसेच डॉ. एस्.एस्. घाळी यांच्यानंतर तालुका राजकारणात काँग्रेस पक्षात विस्कळीतपणा आला होता. अनेक गटतट निर्माण झाले. एकमुखी नेतृत्वाअभावी काँग्रेसची वाताहत झाली. या संधीचा फायदा विरोधी पक्षाने वेळोवेळी उठविला. गडहिंग्लज तालुक्यात विरोधी पक्ष प्रबळ बनला. परंतु १९९१ च्या नगरपालिका निवडणूका जिंकायच्या या इर्षेने बाबासाहेब कुपेकर यांच्या नेतृत्वाखाली राजर्षि शाहू नगरविकास आघाडी स्थापन करण्यात आली. या निवडणुकीत शाहु आघाडीने २७ पैकी १७ जागा जिंकून नगरपालिकेची सत्ता हस्तगत केली. काँग्रेस (आय) मधील हत्तरकी गटाने जनता आघाडीशी युती केली, तर जनता दलाच्या ताब्यातील नगरपालिका हिसकावून घेऊन भाजप-शिवसेनेच्या कुबडीने काँग्रेस नेत्यांनी नगरपालिकेवर शाहू आघाडीचा झेंडा फडकविला खरा पण दिशाहीन नेतृत्वामुळे नगरपालिका कारभाराचे तीन तेरा वाजले असून गडहिंग्लज शहरवासीयांना हे सत्तांतर डोकेदुखी ठरले आहे. शाहू आघाडीच्या संघर्षातून गडहिंग्लज शहराचा विकास दहा वर्षांनी मागे गेला आहे. "सुंदर शहर स्वच्छ शहर" या योजनेला कालिमा फासण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी नागरिकांचा उद्रेक होण्यापूर्वीच सावधानता बाळगून एक दिलाने काम करणे आवश्यक आहे.

## गडहिंग्लज नगरपालिका राजकारण - समालोचन

गडहिंग्लज नगरपालिकेची स्थापना सन १९८७ साली झाली. त्यावेळी सर्व सभासद हे सरकारनियुक्तच असत. सन १९२७ सालापासून नियुक्त सभासदांखेरीज निम्मे सभासद निवडणुकीने येऊ लागले. सन १९२७ पर्यंत डिस्ट्रिक्ट ऑफिसर करवीर इलाखा हे प्रेसिडेंट व पेठयांचे मामलेदार हे व्हाईस प्रेसिडेंट असत. सन १९२७ ते १९४३ पर्यंत मामलेदार किंवा तत्सम सरकारी अधिकारी हेच प्रेसिडेंट म्हणून निवडले जात असत. हुद्देदार नसलेले पहिले नगराध्यक्षपद गडहिंग्लजच्या नागरिकाकडे सन १९४३ साली प्रथम आले. सन १९५२ मध्ये प्रथम सर्व सभासद निवडणुकीने निवडून आले. पुढे सन १९५६-५७ या काळात संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावरुन सर्व नगरसेवकांनी राजीनामे दिले. त्यामुळे या काळात प्रशासक नियुक्त करण्यात आले. सन १९८१ साली नगरपालिकेची मुदत संपल्यामुळे महाराष्ट्र शासनाने नगरपालिका बरखास्त केल्या. म्हणून १९८१ ते १९८५ या काळात गडहिंग्लज नगरपालिकेचा कारभार शासनामार्फत प्रशासकांनी चालविला.[३१] नगरपालिका कारभारावर अनेक वर्षे कॉंग्रेस पक्षाची सत्ता असल्याची आढळते. नगरपालिका निवडणुकीचा आढावा घेतला असता असे आढळते की, १९६७ नंतर वास्तविक पाहता १९७२ साली निवडणूक होणे आवश्यक होती. परंतु प्रत्यक्षात निवडणूक १९७४ साली झाली. त्यानंतर देखील १९७९ मध्ये निवडणूक न होता १९८५ मध्ये निवडणूक घेण्यात आली. दर ५ वर्षांनी निवडणूका न घेता शासनाच्या सोयीप्रमाणे घेतल्याचे आढळते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दर ५ वर्षांनी घेतल्या पाहिजेत अशी तरतूद असताना देखील तिचे पालन झाल्याचे दिसत नाही.

गडहिंग्लज नगरपालिकेत बराच काळ कॉंग्रेसच्या अधिपत्याखालील नगरविकास आघाडीकडे सत्ता असल्याची दिसते. डॉ. एस्.एस्. घाळी

यांनी तब्बल २२ वर्षे नगराध्यक्षपद भूषविले. १९७४ साली पालिकेत जनता आघाडीने बहुमत मिळविले. परंतु शासनाने थेट जनतेमधून नगराध्यक्ष निवडीचे धोरण स्वीकारल्यामुळे नगराध्यक्ष होण्याची संधी कॉंग्रेसचे डॉ. घाळी यांना मिळाले. सन १९८५ साली झालेल्या निवडणुकीत सत्तांतर होऊन जनता पक्ष पुरस्कृत आमदार श्रीपतराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनता आघाडीने सत्ता प्रस्थापित केली. यावेळी दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा आमदार श्रीपतराव शिंदे यांनी यशस्वी-पणे राबविली. नोव्हेंबर, १९९१ मध्ये झालेल्या नगरपालिका निवड-णुकीत कॉंग्रेस (आय) चे ज्येष्ठ नेते बाबासाहेब कुपेकर यांच्या नेतृत्वाखाली राजर्षि शाहू नगर विकास आघाडीने जनता दलाकडून सत्ता हस्तगत केली. या काळात दरवर्षी नगराध्यक्ष निवडीची परंपरा खंडीत झाली. नगर-पालिकेच्या विविध निवडणुकीत अपक्षांना विशेष संधी मिळाली नाही असे दिसते. नगरपालिकेच्या राजकारणात १९८५ नंतरच्या काळात कॉंग्रेस पक्षाला तुल्यबळ विरोधी असा जनतापक्ष नगरपालिकेत निर्माण झालेला आढळतो.

या प्रकरणाच्या विवेचनावरून गडहिंग्लज नगरपालिकेच्या राज-कारणाची, वाटचालीची कल्पना येते. प्रशासकीय, रचनात्मक व जबाब-दारीची अनेक स्थित्यंतरे झालेली आढळून येतात. प्रशासकीय राजवटीचा अल्पसा काळ वगळता बाकीचा सर्व कालावधी गडहिंग्लज नगरपालिका लोक-प्रतिनिधींच्या हाती असलेली दिसते. वाढत्या लोकसंख्येबरोबर शहराचाही विस्तार वाढला आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला. लोकनियुक्त नगरसेवकांना शहर विकासाच्या विविध योजना राबवाव्या लागल्या. स्वातंत्र्योत्तर काळात लोककल्याणकारी राज्याच्या स्वीकारामुळे नगरपालिकेची जबाबदारी वाढली. आपल्या नगरपालिकेच्या क्षेत्रातील

रहिवाशांना नागरी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिकेला विविध कार्ये करावी लागतात. नगरसेवकांच्यामधून विविध समित्या स्थापन करून नागरी प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी नगरपालिका कार्यरत असते. नगरपालिकेच्या माध्यमातून अशी विविध कार्ये करीत असताना किंवा विविध आघाडयांचा राजकारणातील सहभाग आणि त्यातील यश आणि अपयश किती हा भाग वेगळा आहे. शहर विकासासाठी नगरपालिकेचे स्थान आणि त्यातील राजकारण महत्वपूर्ण असते, एवढे मात्र निश्चित आहे. अशा स्थानिक संस्था या ख-या लोकशाहीच्या शाळाच होत.

गडहिंग्लज नगरपालिकेच्या गेल्या १० वर्षांच्या इतिहासाचा जर आपण आढावा घेतला तर आपल्या असे लक्षात येईल की, तालुक्याच्या स्थानिक राजकारणाचा नगरपालिकेच्या राजकारणावर मोठया प्रमाणामध्ये परिणाम होतो. डॉ. घाळी यांच्या राजकारणामध्ये त्यांनी नगरपालिके-मध्ये केलेल्या कार्याची भूमिका महत्वाची होती. कारण ते दोन वेळा विधानसभेवर गडहिंग्लज शहरातील मतदारांच्या भरघोस पाठिंब्यावर निवडून आले होते. जनता दलाचे या तालुक्यात थोडेबहुत काम होते त्याचा उपयोग श्रीपतराव शिंदे यांना झाला. १९८५ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा विजय झाल्यानंतर गडहिंग्लज नगरपालिकेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि त्यात ते ब-याच प्रमाणात यशस्वी ठरले. आमदार झाल्यानंतर त्या पदाचा वापर करून त्यांनी नगरपालिकेवर आणि साखरकारखान्यावरही आपले वर्चस्व काही वर्षे प्रस्तापित केले. तालुक्या-मध्ये कॉंग्रेस पक्षाची मुळे खोलवर रूजलेली असली तरी त्यात तीन गट असल्या-मुळे आणि ते गट ऐकमेकांच्या विरोधी काम करीत असल्यामुळे श्रीपतराव शिंदे यांना स्थानिक राजकारणात यश मिळाले पण या गटांच्यामध्ये फेर जुळणी झाल्यानंतर शिंदे यांच्या राजकारणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या.

.....

## प्रकरण तिसरे

### संदर्भ सूची


१] गोकाककर सुधाकर आणि चराटी शामराव [संपादक] : हिरण्यकेशीच्या काठी
गडहिंग्लज नगरपरिषद शताब्दी स्मृतिग्रंथ.
प्रकाशन – जानेवारी १९८९.
पृष्ठ नं. ३५, ३९, ४०, ४३, ४५, ४७.

२] दैनिक सकाळ, कोल्हापूर : दिनांक १० ऑक्टोबर १९८७.

३] गोकाककर सुधाकर आणि चराटी शामराव [संपादक] : तत्रैव, पृष्ठ नं. १४४, १४५, १५४.

४] : तत्रैव, पृष्ठ नं. १५५ ते १६३.

५] कित्तुरकर रावसाहेब [स्मरणिका संपादक] : " देवमाणूस " डॉ. घाळी स्मरणिका
लेख – गडहिंग्लज नगरीचे शिल्पकार – डॉ. घाळी
लेखक – श्री. शंकराप्पाण्णा हिडदुगी.

६] दैनिक सकाळ, कोल्हापूर : दि. २५ एप्रिल १९८५.
दैनिक पुढारी, कोल्हापूर : दि. २४ व २६ एप्रिल १९८५.

७] गोकाककर सुधाकर व चराटी शामराव [संपादक] : तत्रैव, पृष्ठ नं. २१८

८] : तत्रैव, पृष्ठ नं. १६४, १६५.

९] दैनिक सकाळ, कोल्हापूर : दादा पेडणेकर निधनानिमित्त लेख.

१०] देवगोंडा काशिनाथ [प्रकाशक] : जनता आघाडी गडहिंग्लज – कामाचा अहवाल आणि जाहिरनामा.

११] तरुण भारत, कोल्हापूर : आमदार श्रीपतराव शिंदे गौरव पुरवणी अंक
दिनांक १५ मे १९९४.

१२] मगदूम राम [संपादक] : आमदार श्रीपतराव शिंदे गौरव अंक
पृष्ठ नं. ८ ते १०.

| | | | |
|---|---|---|---|
| १३] | | : | तत्रैव , पृष्ठ नं. ११, १२, |
| १४] | दैनिक सकाळ, कोल्हापूर | : | दि. २८ मे १९९०. |
| १५] | दैनिक तरुण भारत, कोल्हापूर | : | आमदार श्रीपतराव शिंदे गौरव पुरवणी अंक दि १५ मे १९९४. |
| १६] | | : | तत्रैव पृष्ठ नं. ४, ९ |
| १७] | दैनिक सकाळ, कोल्हापूर | : | २ मार्च १९९०. |
| १८] | | : | तत्रैव , २६ नोव्हेंबर १९८७. |
| १९] | | : | तत्रैव, विधानसभा निवडणूक पुरवणी. |
| २०] | | : | तत्रैव, विधानसभा निवडणूक पुरवणी. |
| २१] | दैनिक सकाळ, कोल्हापूर | : | दि. ६ मार्च १९९०. |
| २२] | | : | तत्रैव, ३० जून १९९०. |
| २३] | तत्रैव | : | २२ सप्टेंबर १९९१. |
| २४] | | : | तत्रैव २१ नोव्हेंबर १९९१. |
| २५] | दैनिक पुढारी, कोल्हापूर | : | दि. २६ नोव्हेंबर १९९१. |
| २६] | दैनिक सकाळ, कोल्हापूर | : | नगरपालिका निवडणूक विश्लेषण - १९९१. |
| २७] | गोकाककर सुधाकर व चराटी शामराव [ संपादक ] | : | तत्रैव पृष्ठ नं. १६९ , १७०. |
| २८] | गडहिंग्लज सृष्टी, साप्ताहिक वृत्तपत्र | : | दि. १० ऑक्टोबर १९९४. |
| २९] | दैनिक सकाळ, कोल्हापूर | : | दि. २० नोव्हेंबर १९९५. |
| ३०] | दैनिक केसरी, सांगली | : | दि. १० जानेवारी १९९६. |
| ३१] | गोकाककर सुधाकर व चराटी शामराव [ संपादक ] | : | तत्रैव - पृष्ठ नं. १५४. |